जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नाफेड, एन सी सी एफ कडून होणाऱ्या कांदा खरेदीतील घोटाळ्याची चौकशी करा

नगर - कांद्याचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी नाफेड व एन सी सी एफ मार्फत होणाऱ्या कांदा खरेदीत मोठ्या प्रमाणात घोटाळा होत असतो. नाफेड, एन सी सी एफ चे पदाधिकारी व अधिकारी तसेच फ्रेडरेशनचे प्रमुख मिळून सरकारी तिजोरीवर डल्ला मारत आहेत. या गैरव्यवहाराची चौकशी व्हावी अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

भारत सरकारच्या ग्राहक व्यवहार मंत्रालयाने नाफेड व एन सी सी एफ या दोन एजन्सीनी कांदा खरेदी, साठवणूक व वितरणासाठी संस्थांची नेमणूक सुरू केली आहे. ज्या वेळेस बाजारात कांद्याचा तुटवडा होऊन कांद्याचे दर वाढण्यास सुरुवात होते तेव्हा हा कांदा बाजारात विकून कांद्याचे दर नियंत्रित केले जातात.

ज्या संस्थांना कांदा खरेदीची जबाबदारी दिली जाणार आहे त्याची निवड प्रक्रिया पारदर्शक नाही. एकूण कांदा खरेदी, साठवणूक व वितरण बाबत अत्यंत गोपनीयता पाळली जाते. माहिती अधिकारात अर्ज केले तरी माहिती देण्यास टाळाटाळ केली जाते. ज्या संस्थांचा मागील व्यवहार अतिशय संशयास्पद, भ्रष्ट व अप्रामाणिक राहिला आहे, ज्यांनी सरकारी निधीचा अपहार केला आहे त्यांना पुन्हा कांदा खरेदीची जबाबदारी देणे कितपत योग्य होणार आहे?

या वर्षी होणाऱ्या कांदा खरेदीत नाफेड, एफ पी ओ च्या फ्रेडरेशनला न देता सहकारी संस्थांना देणार आणि एन सी सी एफ मात्र सहकारी संस्था तसेच एफ पी ओ फ्रेडरेशन या दोन्हींना खरेदीचे अधिकार देणार असल्याचे समजते. असे केल्याने ही व्यवस्था सुधारण्याची काही शक्यता दिसत नाही. ज्या सहकारी संस्थांना ही जबाबदारी दिली जाणार आहे त्याची आर्थिक आणि साठवणुकीसाठी आवश्यक क्षमतेची पडताळणी नाफेड करणार आहे का? या नवीन व्यवस्थेमुळे कांदा खरेदी व वितरणातील भ्रष्टाचार संपणार आहे का? हा खरा प्रश्न आहे.

कांदा खरेदीचा परवाना मिळण्यासाठी लाखो रुपये द्यावे लागतात अशी चर्चा आहे. नाफेडचे विद्यमान अध्यक्ष यांनी, कांदा खरेदी करणाऱ्या काही संस्थांवर धाड टाकली होती. त्यात अनेक आक्षेपार्ह बाबी समोर आल्या होत्या. त्याचे पुढे काहीच झाले नाही. मात्र त्या नंतर जास्त गैरप्रकार झाल्याचे दिसून येत आहेत.

काही फ्रेडरेशने कांदा खरेदी न करता फक्त कागदोपत्री साठा दाखवला. कांद्याचे दर वाढल्या नंतर काही फ्रेडरेशनने साठवलेला नाफेड व एन सी सी एफ चा उन्हाळ कांदा बाजारात विकला. नंतर कांदा देण्याच्या वेळेस स्वस्त लाल कांदा देऊन भरपाई केली आहे. महाराष्ट्रातून गोवा, कर्नाटक, बिहार, उत्तरप्रदेश आदी राज्यांमध्ये अनुदानित दरात पुरविण्यात आला होता. या पैकी अनेक राज्यात कांदा न पाठवता खोटी कागदपत्र तयार करून मोठ्या रकमेचा अपहार केला आहे. ग्राहक व्यवहार विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत कांदा चाळीत कांदा दिसून आला नाही. करदात्यांच्या पैसा व सरकारी तिजोरीवर डल्ला मारण्यात नाफेड, एन सी सी एफ, फ्रेडरेशन व काही शेतकरी सहभागी आहेत असा आरोप अनिल घनवट यांनी केला आहे. या घोटाळ्याची सखोल चौकशी व्हायला हवी अशी मागणी घनवट यांनी ग्राहक व्यवहार मंत्रालयाला पाठवलेल्या निवेदनात केली आहे.

या वर्षी होणाऱ्या कांदा खरेदीवर. स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटना बारकाईने नजर ठेवणार असून सरकारी निधीची लूट करणाऱ्यांना समाजासमोर उघड करण्याचा प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी किरकोळ कमिशनसाठी भ्रष्ट फ्रेडरेशनकडून आपल्या बँक खात्यावर पैसे स्विकारू नयेत. ज्या शेतकऱ्यांच्या खात्यावर कांदा विक्रीचे पैसे येतात त्यांनी खरोखर त्या किमतीचा कांदा नाफेड किंवा एन सी सी एफ ला दिला आहे का याची शहानिशा केली जाईल.

महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी, ग्राहक व सरकारी तिजोरीची लूट थांबवण्यासाठी राजकीय पुढारी, व्यापारी, फ्रेडरेशन, व भ्रष्ट अधिकारी यांची अभद्र युती कायमची तोडण्यासाठी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जागरूक रहावे आणि स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनेला सहकार्य करावे असे आवाहन स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, अनिल घनवट यांनी दिलेल्या पत्रकात केले आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६११

॥ जय जिनेन्द्र ॥

### जैनीयांसाठी नवे महामंडळ

**युवा, महिला, व्यापारी, उद्योजकांना सुवर्णसंधी.**

काल आनंदधामच्या पावन प्रांगणात सकल जैन समाज एकत्रित झाला होता. आनंदाची गोष्ट म्हणजे यावेळी सामाजिक एकोपा व विकासाच्या दृष्टीने विचारमंथन आणि मार्गदर्शन झाले. विषय होता जैनांच्या आर्थिक, शैक्षणिक व एकूणच सर्वांगिण प्रगतीचा.

जैन समाजाला २०१४ मध्येच अल्पसंख्याकाचा दर्जा मिळाला होता. पण महाराष्ट्र शासनाने ब्राह्मण, सोनार इ. बरोबरच जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ निर्माण करून राज्यमंत्र्याचा दर्जा असलेल्या या कायदेशीर मंडळावर ललित जैन यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली.

तेच अध्यक्ष ललित जैन या महामंडळात जैन समाजासाठी काय आहे. यातून समाजाचा विविध वर्गाला किती फायदे होऊ शकतील याचे मार्गदर्शन करण्यास आले होते. त्यांचे अभ्यासपूर्ण, अनुभवसंपन्न विवेचन खूप काही सांगत होते.

सर्वप्रथम अल्पसंख्याक हा फक्त संख्यावाचक शब्द आहे. आजही देशातला २४% आयकर जैन भरतात आणि सामाजिक सेवा सुविधा देणाऱ्या संस्थात ६३% वाटा जैनांचा आहे.

केंद्राच्या अल्पसंख्याक विभागाच्या ६ विभागातून माहिती व अनुभव घेत ललित जैन यांनी अनुभव घेतल्याने त्यांनी सादर केलेले सर्व प्रोजेक्टस् व संकल्पना राज्य सरकारने १००% स्वीकारलेत. सामान्य व दुर्बल जैन ३०% असल्याने त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक उन्नतीसाठी अनेक योजना आहेत. एकल-विधवा महिलांना सहाय्य, व्यापार उद्योजकांना सीड व मार्जिन मनी कर्जे, युवा स्टार्टअप, महिला बचत गट, परदेशी शिक्षण, ग्रंथालय, वसतीगृहे इ. सर्वंकष योजना आहेत.

या महासंमेलनाच्या यशस्वीतेसाठी कुशल संघटक वसंत लोढा व सर्व सामाजिक, धार्मिक, पंथीय संघांचे मनापासून अभिनंदन. आता खरी गरज व वेळ आहे अशीच एकी ठेवण्याची. किमान अल्पसंख्याकविषयी सेवा सुविधा घेण्याबद्दल सर्व तालुकावार संपर्क ठेवून समाजातील दुर्बल व सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी निरंतर प्रयत्न करण्याची. आमच्याही शुभेच्छा.

**- किशोर गांधी**

# तरुणावर चाकूने हल्ला करत जीवे मारण्याचा प्रयत्न

**सारसनगर येथील घटना, सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

नगर - दुचाकीवरुन आई-वडिलांना भेटण्याकरीता गेलेल्या तरुणास अडवून, तू या रस्त्याने का येतोस असे म्हणून ६ जणांनी शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यातील एकाने चाकूने तरुणाच्या डोक्यात मारुन त्याच्या खुनाचा प्रयत्न केला व इतरांनी दगड फेकून मारुन दुखापत केली. ही घटना सारसनगर येथील भगवानबाबा चौक येथे २२ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता घडली.

याबाबत योगेश भागीनाथ तांदळे (वय २५, रा. कानडेमळा, सारसनगर) याने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी योगेश तांदळे हा आई वडील यांना भेटण्याकरिता त्याच्या मोटारसायकल वरुन भगवानबाबा चौकातून जात असताना ऋषिकेश अशोक बडे, अविनाश विश्वास जायभाय, नितीन किसन लाड, अजित रामदास केकाण, निखिल जायभाय व संतोष विष्णू आहेर (सर्व रा. सारसनगर) यांनी त्यास अडवून तू या रस्त्याने का येतोस असे विचारले असता त्याने मग काय झाले असा उलट प्रश्न विचारल्याने ६ जणांना राग आला. त्यांनी आज यास जीवे ठार मारुन टाकू असे म्हणून शिवीगाळ दमदाटी करीत लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

यातील ऋषिकेश बडे याने त्याच्या कमरेचा चाकू काढून योगेश यास ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या डोक्यात मारुन त्याच्या खुनाचा प्रयत्न केला व इतरांनी जाताना दगड फेकून मारुन त्यास दुखापत केली. या मारहाणीत योगेश तांदळे हा गंभीर जखमी झाला. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी योगेश तांदळे यांनी दिलेले फिर्यादीवरुन ६ जणाविरुद्ध भारतीय न्याय संहिता १०९, ११८ (१), ११५ (२), १२५, १८९, १९१ (२) (३) १९० ३२४ (४) प्रमाणे खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे हे करीत आहे.

दरम्यान या संदर्भात ऋषिकेश अशोक बडे (रा. भगवान बाबा नगर, सारसनगर) यानेही परस्पर विरोधी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले आहे की मागील भांडणाचा मनात राग धरुन स्वप्निल वारे, सोमनाथ वायभासे, योगेश तांदळे (सर्व रा. सारसनगर) यांनी शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी व चाकूने मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत ऋषिकेश बडे, मनीषा तांदळे व अजित केकाण हे जखमी झाले.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात ऋषिकेश बडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता ११८ (१), ११५ (२) ३५१ (२)( ३) ३५२, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार डी. बी. पालवे हे करीत आहे.

# विठ्ठल रुक्मिणी मंदिरात चोरी; सोने व पितळाचे दागिने लंपास

नगर - मंदिराच्या बंद दरवाज्याचे कडी कोयंडा कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने मंदिरातील २६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे व पितळी धातूचे दागिने असा ऐवज चोरुन नेला. ही घटना नगर तालुक्याची नांदगाव येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात २२ एप्रिल रोजी रात्री ८ ते २३ एप्रिल रोजी सकाळी ६.३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत मंदिराचे पुजारी बाळासाहेब पुंजाहरी बोरुडे (वय ५५, रा. नांदगाव, ता. नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीत बोरुडे यांनी म्हटले आहे की २२ एप्रिल रोजी नेहमीप्रमाणे रात्री ८.३० वाजता मंदिर बंद केले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी मंदिराची साफसफाई करण्याकरिता मंदिर उघडण्याकरीता गेलो असता दरवाजाचे कडी, कोयंडा, कुलूप तुटलेले दिसले. आत जाऊन पाहिले असता रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या डोक्यावरील ८ हजार रुपये किमतीचा पितळी धातूचा एक किलो वजनाचा टोप, ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणीमंगळसूत्र, कानातील ३ हजार रुपये किमतीचे पितळाच्या धातूचे कुंडल असा २६ हजार रुपये किमतीचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेला असल्याचे निदर्शनास आले.

याप्रकरणी बाळासाहेब बोरुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) ३३१(४) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला.

पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भालेराव करीत आहे.

# वैदुवाडी येथे युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

नगर - राहत्या घरात छताला गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केल्याची घटना सावेडी उपनगरातील वैदूवाडी येथे २३ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास घडली. आशिष कालू शिंदे (वय १९, रा. वैदुवाडी, सावेडी) असे मृत तरुणाचे नाव आहे.

आशिष याने घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यास त्याचे नातेवाईक मालू बाबू शिंदे (रा. वैदुवाडी, सावेडी) याने सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून तो औषध उपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वाघ यांनी दिलेल्या अहवालावरून तोफखाना पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार प्रियंका राऊत या करीत आहे.

# 'महावितरण कंपनी'कडून २६ एप्रिलला 'शटडाऊन'असल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरात विलंबाने पाणीपुरवठा

नगर - महावितरण कंपनीला ट्री कटिंग तसेच बाकीचे देखभाल व दुरूस्तीचे काम करण्यासाठी ३३ के.व्ही मुळा डॅम विद्युत वाहिनी २६ एप्रिल रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शटडाउन घेण्यात येणार आहे. तसेच सदर शट डाउन वेळेत अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी 'पुरवठा योजनेवरील महत्वाची दुरूस्तीची कामे शनिवार रोजी सकाळी ११.०० ते सांय. ५.०० वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे. दरम्यान काळात मुळानगर, विळद येथून होणारा पाण्याचा उपसा बंद राहणार असल्याने शहर पाणी वितरणासाठीच्या टाक्या भरता येणार नाही. त्यामुळे शनिवार २६ एप्रिल रोजी बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर तसेच सारसनगर, बुरूडगाव रोड, केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर इ. भागास सकाळी ११.०० नंतरच्या पाणी वाटपाच्या भागास पाणीपुरवठा होऊ शकणार नाही. सदरचा पाणीपुरवठा हा रविवार २७ रोजी करण्यात येईल.

तसेच रविवारी (दि.२७) रोटेशननुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळु बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर इ. भागात महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येणार नाही, या भागातील पाणीपुरवठा हा रविवार ऐवजी सोमवारी (दि.२८) करण्यात येईल.

सोमवारी (दि. २८) रोजी पाणी पुरवठा होऊ घातलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळेरोड, आनंदीबाजार, कापड बाजार, खिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने मनपा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर व सावेडी इ. भागात महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा होणार नसून तो मंगळवारी (दि.२९) करण्यात येईल.शहरातील पाणीपुरवठा एक दिवस बंद करुन उपनगरात ज्या भागात जास्त दिवसाचे रोटेशन आलेले आहे, अशा भागात पाणीपुरवठा करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे मनपाने दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

# घरात गळफास घेत तरुणीची आत्महत्या

नगर - राहत्या घरात छताला गळफास घेऊन २० वर्षीय तरुणीने आत्महत्या केली. ही घटना नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील गवारे नाना रोडवर २३ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता सुमारास घडली. पुनम राजू ढाबे (रा. पिंपळगाव माळवी, ता.नगर) असे मृत तरुणीचे नाव आहे. पूनम हिने घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच तिला खासगी अँम्ब्युलन्सने दत्तात्रय गुलाब जाधव याने सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले. तेथील डॉक्टरांनी तिला तपासून ती औषध उपचारापूर्वीच मयत झाली असल्याचे घोषित केले. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खेडकर यांच्या अहवालावरून एमआयडीसी पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.



अकोळनेर येथील सप्ताहात भाविक महिलांच्या दागिन्यांची चोरी करणारी टोळी पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत नगर तालुका पोलिस ठाण्याचे पथक.

# डाक विभागात मुलाखतीद्वारे विमा प्रतिनिधींची नेमणूक

नगर - टपाल जीवन विमा व ग्रामीण टपाल जीवन विमा योजनेंतर्गत विविध विमा पॉलिसींच्या विक्रीसाठी वरिष्ठ अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर येथे थेट मुलाखतीद्वारे विमा प्रतिनिधींची नेमणूक केली जाणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी ८ व ९ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत वरिष्ठ अधीक्षक डाकघर कार्यालयात मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन डाकघरच्या वरिष्ठ अधीक्षकांनी केले आहे.

विमा प्रतिनिधी म्हणून बेरोजगार तरुण, तरुणी, स्वयंरोजगार असणारे महिला व पुरुष, सेवानिवृत्त कर्मचारी, कोणत्याही कंपनीचे माजी विमा प्रतिनिधी, अंगणवाडी कर्मचारी, महिला मंडळ कर्मचारी, स्वयंसेवी संघटना चालक, माजी सैनिक अथवा पात्रता धारक उमेदवार अर्ज करु शकतात. उमेदवाराचे वय १८ वर्षे पूर्ण असावे व १० पास असावा. उमेदवारास विमा पॉलिसी विक्रीचा अनुभव, संगणकाचे ज्ञान, स्थानिक भागाची माहिती असणे आवश्यक आहे.

निवड झालेल्या उमेदवारांना आयआरडीएची ऑनलाईन परीक्षा पास करावी लागेल. तसेच पाच हजार रुपयांचे टपाल बचत खात्यामध्ये राष्ट्रीय बचतपत्र, किसान विकासपत्रामध्ये तारण म्हणून ठेवावे लागेल. विमा प्रतिनिधी म्हणून निवड केलेल्या उमेदवारांना टपाल विभागाने ठरवून दिल्याप्रमाणे कमिशन दिले जाईल. उमेदवारांनी थेट मुलाखतीसाठी वरिष्ठ अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर यांच्या नावाने केलेला लेखी अर्ज, शैक्षणिक पात्रतेची आवश्यक मुळ प्रमाणपत्रे व छायांकित प्रती, आधारकार्ड, छायाचित्रासह इतर आवश्यक कागदपत्रांसह मुलाखतीस उपस्थित रहावे, असेही कळविण्यात आले आहे.

## किराणा मालाचे व्यापारी सुभाष साखरे यांचे निधन

नगर - करंजी येथील किराणा मालाचे व्यापारी सुभाष नामदेव साखरे (वय ७३) यांचे निधन झाले. त्यांच्यावर करंजी येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन बहिणी, तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सुरेश साखरे व सुनील साखरे यांचे ते मोठे बंधू होते व बाळासाहेब, अश्विन, निलेश साखरे यांचे ते वडील होत.

## पुष्पाबाई दिकोंडा यांचे आकस्मिक निधन

नगर - धनगरगल्ली येथील देशपांडे हॉस्पिटल समोर राहणाऱ्या पुष्पाबाई विठ्ठलराव दिकोंडा (वय ७४) यांचे २४ एप्रिल रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विनायक व उमेश दिकोंडा यांच्या त्या मातोश्री होत.

## पाळत ठेवून दागिन्यांची चोरी

(पान १ वरुन)

काही वेळातच ३-४ महिला आणि काही पुरुषांना पकडण्यात आले. तेथे बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांना माहिती देण्यात आली. ही माहिती मिळताच नगर तालुका पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते हे मोठ्या फौजफाट्यासह तेथे दाखल झाले. नागरिकांनी पकडलेल्या महिला व पुरुषांकडे कसून तपासणी केल्यावर काही महिलांकडे चोरलेले दागिने सापडले. तसेच त्यांच्या इतर साथीदारांचाही शोध घेण्यात आला. या चोरट्यांच्या टोळीत एकूण १८ जणांचा समावेश असल्याचे समोर आले. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

# कर्जत तहसिल कार्यालयात २५ एप्रिलला वाळूचा लिलाव

नगर - कर्जत तालुक्यात जप्त करण्यात आलेल्या १४ ब्रास वाळू साठ्यांचा लिलाव अटी व शर्तीच्या अधिन राहून ११ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता. परंतू सदर लिलावात वाळूचा लिलाव झाला नसल्याने २५ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता तहसिल कार्यालय, कर्जत येथे वाळू साठ्याचा लिलाव आयोजित करण्यात आला आहे. इच्छुकांनी अनामत रक्कम भरुन लिलावात सहभागी होण्याचे आवाहन तहसीलदार गुरु बिराजदार यांनी केले आहे.

लिलावाच्या अटी व शर्ती तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, कर्जत तसेच राष्ट्रीय सुचना व विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही कळविण्यात आले आहे.

## पार्किंगमध्ये लावलेल्या मोटारसायकलची चोरी

नगर - रेल्वेस्टेशन रोडवरील जंगमवस्ती येथील राहते घराचे पाठीमागील पार्किंगमध्ये लावलेली मोटार सायकल (क्र.एम एच १६ सी टी ५१२८) अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. या प्रकरणी आकाश राजु जंगम (वय २४, रा. जंगमवस्ती, रेल्वेस्टेशन, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जप्त केलेल्या वाहनांचा २५ एप्रिलला जाहीर लिलाव

नगर - कर्जत तालुक्यात अवैधरित्या गौणखनिज उत्खनन करुन वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या मालकांनी दंडात्मक कार्यवाहीत आदेशातील रक्कम शासन जमा न केल्याने ही रक्कम वसूल करण्यासाठी २५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, कर्जत येथे वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे.

लिलावात भाग घेण्याचा अर्ज, लिलाव होणाऱ्या जंगम मालमत्तेची किंमत, अनामत रक्कम, तसेच लिलावाच्या अटी व शर्तीकरिता तहसीलदार, कर्जत यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे तहसीलदार गुरु बिराजदार यांनी कळविले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### उन्हाळ्यात प्या ही सब्जा पेये

उन्हाळ्यातील उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी आणि शरीर आतून थंड राहण्यासाठी सब्जा बिया लिंबूच्या सरबतात आणि त्यात साखर न घालता मध मिसळून डिटॉक्स पेय तयार करा त्याच बरोबर सब्जा बिया फळांच्या रसात, स्मूदीजमध्ये किंवा नारळाच्या पाण्यात घालून सेवन करू शकता. सब्जा बिया दही, पुडिंग्ज, आईस्क्रीम किंवा फळांच्या सॅलडमध्ये मिसळून खाल्ल्याने शरीराला थंडावा मिळतो. सब्जा बिया कोमट पाण्यात मिसळून पायल्याने पचन आणि वजन कमी होण्यास मदत करते.

## पाककला

### पालक पोहे वडे

**साहित्य :** पालक २ वाटी, पोहे १ वाटी, साबुदाणा १/२ वाटी, हिरवी मिरची ४, दही १ वाटी, कोथिंबीर १/२ वाटी, खाण्याचा सोडा चिमूटभर, मीठ चवीनुसार

**कृती :** प्रथम साबुदाणा साधारण ७ ते ८ तास भिजत घालावा. पालक १ मिनिट पाण्यात भिजत ठेवावे. नंतर त्यातील पाणी काढून ते १० मिनिटे झाकून ठेवावे. पालक बारीक चिरून घ्यावा. नंतर भिजलेल्या पोह्यात पालक, बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, मीठ, खाण्याचा सोडा चिमूटभर, कोथिंबीर टाकावी. सर्व जिन्नस हाताला तेल लावून एकजीव करावे. भिजलेला साबुदाणा मिश्रणात घालावा व मिश्रण एकजीव करावे. प्लास्टिक कागदावर वडे थापावे व गुलाबी होईपर्यंत तळावे. आता तळलेले वडे प्लेटमध्ये काढून त्यावर दही घालावे. वरून कोथिंबीर भुरभुरावी.

## सौंदर्य

### दररोज वापरा स्वच्छ स्कार्फ

* सूर्यप्रकाशापासून त्वचेचं संरक्षण करण्यासाठी दररोज स्वच्छ स्कार्फ वापरा. अस्वच्छ स्कार्फ वापरल्याने घाम येवून बॅक्टेरिया वाढून चेहऱ्यावर पिंपल्स येवू शकतात.

* फक्त कॉटन स्कार्फ वापरा. कारण सुती कपड्यामुळे कोणत्याही प्रकारची जळजळ होत नाही आणि त्वचेचे संरक्षण देखील होते.

## सल्ला

शाबुदाणा खिचडी लवकर शिजण्यासाठी ती कढई किंवा खोलगट भांड्यात बनवू नका. पॅन किंवा पसरट भांड्यात बनवावी.

## वास्तू

अर्थिक संकटापासून सुटका हवी असेल तर खिशात पिंपळाचे पान ठेवावे. याने कमी वेळात तुमची यशस्वी आणि श्रीमंत होण्याची शक्यता वाढते.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५

**प्रदोष, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, पू.भा.०८|५४, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**वृषभ** : कलाकारांना धवल यश मिळण्याचे योग आहेत. आपणास नवे वाहन खरेदी कराल. मानसन्मानात वाढ होईल. मागील उधारी वसुल होईल.

**मिथुन** : एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक सहभागी व्हाल. वाहने व उपकरणे बिघडतील.

**कर्क** : आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल. विवाहेच्छूकांचे रखडलेले विवाह जमतील.

**सिंह** : आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील. गैरसमज निर्माण होईल.

**कन्या** : मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**तूळ** : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल मात्र आरोग्यविषयक समस्या निर्माण होतील. व्यस्त राहाल. पाकिट चोरी होईल.

**वृश्चिक** : स्वत:च्या ईच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे. सामाजिक कार्यामध्ये सहभागी व्हाल.

**धनु** : कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. मित्रांचा आधार मिळेल. नवीन गृहखरेदीसाठी चांगला दिवस.

**मकर** : ज्येष्ठांचे आशिर्वाद व मार्गदर्शन लाभेल. एखाद्या जवळच्या मित्राबरोबर व्यावसायिक भागीदारी कराल. यशस्वी व्हाल.

**कुंभ** : भाऊबंद डोके वर काढतील. चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. राजकीय व्यक्तींसाठी संमीश्र प्रमिसाद मिळेल.

**मीन** : एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल. भाऊबंद डोके वर काढतील.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

यजमान : आम्ही ना दार्जीलिंगचा चहा वापरतो

पुणेकर : वा, तरीच छान थंड होता...


## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणते राज्य १००% लोकांचे कोविड लसीकरण झालेले पहिले राज्य ठरले आहे?

– तेलंगणा

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## फिल्मीचक्कर क्र. ११८६ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) रंजना, रवींद्र महाजनी, अशोक सराफ, प्रिया तेंडुलकर, राघवेंद्र कडकोळ यांचा एक मराठी चित्रपट ६) 'शोले' चित्रपटातील हेमामालिनीचे नाव ७) दिलीपकुमार, नादिरा; निम्मी यांचा एक चित्रपट ८) अमिताभ बच्चन, टीना मुनीम; रणधीर कपूर, झीनत अमान, ओम शिवपुरी, प्रेम चोप्रा, डॉ. श्रीराम लागू, सत्येन कप्पू यांचा एक चित्रपट ९) जी. पी. सिप्पी, रमेश सिप्पी यांनी 'शोले' नंतर काढलेला मोठा चित्रपट १०) एक अभिनेत्री ++ रॉय १२) ++ का पंछी (चित्रपटाचे नाव) १३) या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी अमिताभ बच्चनला अपघात झाला होता १४) राम तेरे +++ ++ (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** २) अजय देवगण, करिश्मा कपूर, मनीषा कोईराला यात आहेत ३) गोविंदा, खुशबू यांचा एक चित्रपट ४) ऋषी कपूर, राजीव कपूर, नगमा, जयाप्रदा, फराह, मामुटी, डॅनी यांचा चित्रपट ५) मनोजकुमार, वहिदा रहेमान, मुमताज यांचा एक गाजलेला चित्रपट ७) विनोद खन्ना, रेखा, रीना रॉय, रणधीर कपूर यांचा एक चित्रपट ११) +++ से मजबूर (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : मुर्खाला अक्कल देणे हे नास्तिकाला प्रसाद देण्यासारखेच असते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### हिंदू पंचांगातील शुक्लपक्ष व कृष्णपक्ष काय आहे?

कोणतीही क्लिष्ट आकडेवारी न मांडता तसेच कोणतीही अवघड समीकरणे सादर न करता मी अतिशय साध्या, सोप्या आणि सर्वांना समजेल अशा भाषेत दर पंधरा दिवसांनी येणाऱ्या अमावस्या आणि पौर्णिमेचे विज्ञान सांगणार आहे..

पृथ्वी ही स्वतःभोवती फिरता फिरता लंब वर्तुळाकार दिशेत सूर्याभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करते तिला सूर्या भोवती संपूर्ण एक प्रदक्षिणा घालायला ३६५ दिवस लागतात त्याला आपण एक वर्ष म्हणतो.. चंद्र सुद्धा सूर्या भोवती फिरता फिरता पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालतो चंद्राला पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा घालायला २७ दिवस लागतात त्याला आपण एक महिना म्हणतो..!

अमावस्येला चंद्र हा पृथ्वी आणि सूर्य यांच्याम ध्ये असतो म्हणजेच अमावस्येला पृथ्वी चंद्र आणि सूर्य सरळ रेषेत असतात. अमावस्येलाच सूर्यग्रहण होते. परंतु प्रत्येक अमावस्येला सूर्यग्रहण होत नाही. तसेच अमावास्येला सूर्य आणि चंद्र दोघांचे उदय आणि अस्त साधारणता एकाच वेळी होतात.

पौर्णिमेला सूर्य आणि चंद्र यांच्यामध्ये पृथ्वी असते. म्हणजेच सूर्य, पृथ्वी आणि चंद्र हे सरळ रेषेत येतात तेव्हा पौर्णिमा असते. पौर्णिमेच्या दिवशी चंद्राच्या पृथ्वीकडील संपूर्ण पृष्ठभागावर सूर्यकिरण पडल्यामुळे आपल्याला पूर्ण चंद्र दिसतो. चंद्रग्रहण पौर्णिमेच्या दिवशी होते. यामध्ये पृथ्वीची सावली चंद्रावर पडल्यामुळे चंद्रग्रहण निर्माण होते. परंतु प्रत्येक पौर्णिमेला चंद्रग्रहण होत नाही.

पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंतच्या पंधरवड्याला कृष्णपक्ष असे म्हणतात. यामध्ये चंद्राचा क्षय होत जातो व अमावस्येला चंद्र पूर्ण नाहीसा होतो. तसेच अम ावस्येपासून पौर्णिमेपर्यंतच्या पंधरवड्याला शुक्लपक्ष म्हणतात. यामध्ये चंद्राची कला हळूहळू वाढत जाते आणि पौर्णिमेला आपल्याला पूर्ण चंद्र दिसतो.

## टवाळकी

पर्वतावर राहणाऱ्या एका अस्वलास अशी इच्छा उत्पन्न झाली की, जगात प्रवास करून निरनिराळे प्रदेश, प्राणी व त्यांच्या रीतिभाति यांचे अवलोकन करावे.

मग ते अस्वल प्रवासास निघाले व त्याने पुष्कळ अरण्ये व अनेक देश पाहिले. एके दिवशी वाट चुकून ते एका शेजारच्या कुंपणात शिरले असता तेथे त्याने एका डबक्याजवळ पुष्कळ कोंबडी पाणी पीत असलेली पाहिली. ती कोंबडी पाण्याचा एक घोट घेतल्यावर आकाशाकडे ते आपली तोंडे करीत असत व पुनः खाली तोंड करून दुसरा घोटा घेत असत.

हा प्रकार पाहून अस्वलास इतके आश्चर्य वाटले की, त्यासंबंधाचा खुलासा त्या कोंबड्यांना विचारल्याशिवाय त्याच्याने राहवेना. मग त्याने एका कोंबड्यास त्यासंबंधाने प्रश्न विचारला.

तेव्हा कोंबडा त्यास म्हणाला, ''पाणी पिताना आम्ही वरचेवर आकाशाकडे तोंडे करतो ती, देवाने जी सुखे आम्हांस दिली आहेत त्याबद्दल त्याचे आभार मानण्यासाठी करतो. ही धार्मिक चाल आमच्यात फार दिवसांपासून चालत आली असून ती जर आम्ही मोडली तर आम्हांस मोठे पातक लागेल. हे ऐकताच अस्वल मोठमोठ्याने हसू लागले व त्यांस वेडावून त्याने त्यांच्या धर्मभोळेपणाची अगदी टर उडवली.

तेव्हा तो कोंबडा रागावून मोठ्या धीटपणाने त्यास म्हणतो,

गृहस्था, तू या ठिकाणी अगदी नवखा आहेस यामुळे तुझे हे असभ्यपणाचे वर्तन कादाचित् क्षम्य आहे असे म्हणता येईल; तथापि एक गोष्ट तुला सांगितल्याशिवाय माझ्याने राहवत नाही. ती ही की, जे लोक धार्मिक कृत्यांवर विश्वास ठेवतात, त्या लोकांच्या देखत त्या धार्मिक कृत्याची टवाळी करण्यास तुझ्याशिवाय दुसरा कोणताही प्राणी तयार होणार नाही.

तात्पर्य : दुसऱ्याच्या धर्मविधींची टवाळकी करणे हा मूर्खपणा होय.

## रहमते दर्शन (भाग - १)



### खेंचे सुरत गुरू बलवान

सन् १९७५ जुलाई की बात है। मैं स्कूल में कक्षा ९ में सबसे आगे के बैंचों पर बैठा करता था क्योंकि मेरा कद छोटा था । हमारे अध्यापक श्री ओ. पी. दलाल, कक्षा ९ में हमें हिन्दी पढ़ा रहे थे। किताब थी, 'ललित संकलन' । उसके काव्य भाग के प्रथम अध्याय में कबीर साहब की वाणी पढ़ाई जा रही थी। पहले सौपान के तीन-चार दोहे वे समझा चुके थे। गृह कार्य हेतु उन्होंने सौपान के दोहे पढ़कर आने को कहा। मैं घर आ गया। रात को जब मैं सोया तो स्वप्न में बकायदा एक क्लास लगी, जिसमें मैं पहले की भाँति कक्षा में अगले बैंच पर बैठा था । हमारे अध्यापक, ओ. पी. दलाल जी वहाँ मौजूद थे। मैंने पानी पीने के लिए इजाज़त माँगी और पानी पीकर जैसे ही मैं कक्षा के कमरे की ओर आया, तो मैंने देखा कि वहाँ पर महाराज दर्शनसिंह जी नीली पगड़ी में खड़े थे। उनकी पगड़ी से नीला नूर निकल कर मेरे ऊपर पड़ रहा था । मैंने "May I come in, Sir?" कह कर प्रवेश पाया। इसके बाद ओ. पी. दलाल साहब, कबीर साहब की वाणी के दोहे पढ़ाते रहे तथा महाराज दर्शनसिंह जी उनकी बड़ी ही सुन्दरता से व्याख्या करते रहे। कुछ देर बाद दृश्य समाप्त हो गया। सुबह मैंने ये बात अपने पिता जी को भी बताई। उस वक़्त महाराज जी ने गुरु पद का कार्य तिलक नगर से शुरू किया ही था। तभी से मैं महाराज जी के सत्संगों में जाने लगा।

जब १० कक्षा का बोर्ड का पेपर दिया, तो महाराज जी के पढ़ाये हुए कबीर साहब के वही दोहे, हिन्दी के पेपर में आये और मैंने उन दोहों पर सम्पूर्ण व्याख्या लिखी क्योंकि उन दिनों सत्संगों में महाराज जी विभिन्न महापुरुषों की वणियों पर सत्संग करते थे। मुझ पर सत्संग दरिद्रों का गहरा प्रभाव पड़ चुका था। पेपर में एक प्रश्न यह भी था, की सेवा ही सची ईश्वर सेवा है, अपने विचार व्यक्त करो। इस पर मैंने महाराज की दया से बहुत अच्छा लेख लिखा। उस वक्त महाराज जी एक शे'र दोहराते थे :

दर्द दिल के वास्ते पैदा किया इंसान को ।
वरना ताअत के लिए कुछ कम न थे करोबियां ।।

मैंने ये शेर भी लिखा तथा इसका भरपूर अर्थ भी लिखा । फलस्वरूप मुझे हिन्दी में ७०% अंक प्राप्त हुए, जबकि पत्र और निबन्ध, जो मुझे ठीक से आते नहीं थे, उन्हें छोड़ दिया था।

१ अप्रैल १९९६ की बात है। सारी रात बेचैनी सी रही। नींद नहीं आ रही थी। करीब ३ या ४ बजे आँख लगी, तो मैंने पाया कि मैं महाराज दर्शनसिंह जी के हुजूर में बैठा हुआ था। महाराज जी ने अपने काव्य संग्रह, 'मौजे नूर' का हिन्दी अनुवाद देखा, जो कि मैंने एक डायरी में किया हुआ था। असल में मेरे दिल में ये आया था कि जब महाराज राजिन्दर सिंह जी दौरे से वापिस आ जायेंगे, तो मैं यह उनको पेश करूँगा।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### स्वाधिष्ठान चक्र

इस चक्र के ठीक होने पर व्यक्ति ज्ञानी होता है। वह चतुर भी होता है। वह स्वामी विवेकानंद, म ाननीय सूरज भाई और शिवानी बहन की तरह बहुत अच्छा वक्ता होता है। वह हजारों लोगों को प्रभावित करते हैं। उन में जगदीश भाई जी की तरह बहुत अच्छा लिखने की कला आ जाती है। यह चक्र ठीक होने पर व्यक्ति का मनोबल बढ़ जाता है। विपरीत परिस्थिति में डटा रहता है। उस की कल्पना शक्ति गजब की होती है। वह यशस्वी होता है। वह बहुत क्षमावान होता है। दूसरों के गलती करने पर भी उन के प्रति उत्साह भरे बोल बोलता तथा सम्मान और प्यार का भाव रखता है। इस केन्द्र पर बिंदू को देख योग का अभ्यास करो जैसे हम भृकुटी में ध्यान लगाते है। जिन लोगो में कुछ कमियां है उन के इसी केन्द्र पर तरंगे भेजो।

दुर्गुणों का नाश

इस चक्र के व्यवस्थित होने से क्रूरता, गर्व, आलस्य, प्रमाद, अवज्ञा, अविश्वास आदि दुर्गुणों का नाश हो जाता है। लोग रचनात्मक बनने लगते हैं और खुश रहते हैं। इस चक्र से प्रजनन क्रिया संपन्न होती है। वंश पैदा करने के भाव, न्यू शरीर का बनना इस केंद्र से होता है।

मूल आधार और स्वाधिष्ठान एक दूसरे से जुड़े हुए है। स्वाधिष्ठान में मोटे तौर पर अग्नि व आकाश तत्व प्रयोग होता है। रवैया

अगर आप कोई भी कार्य अच्छी तरह नहीं कर पाते हैं तो उसका मतलब है आप की ऊर्जा प्रणाली जकड़ी हुई है।

यह आप के रवैया (व्यवहार) को प्रकट करता है। आप का रवैया जितना सख्त है आप के दिमाग और शरीर में उतनी ही अकड़न है। जिस दिन आप का रवैया अकड़ा हुआ होता है, उस दिन आप का शरीर मुड़ता नहीं है। जिस दिन आप खुश और दिमागी तौर पर लचीले होते है उस दिन आप का शरीर भी बेहतर तरीके से मुड़ता है।

इसके जागृत हो जाने पर शरीर की सभी समस्याएं खत्म हो जाती है। इस चक्र वाले स्थान से प्रजनन क्रिया आरंभ होती है। उस का सम्बन्ध चंद्रमा से होता है। यह जो ध्यान लगाते है उस के लिए सहायक केंद है। सुस्ती और भावहीनता इसी चक्र में है। यह चक्र बड़ी आंतड़ी, गुर्दे, रक्त परिसंचरण, शरीर के तरल पदार्थ और स्वाद की पहचान करता है। जब यह चक्र असंतुलित होता है तो नपुंसकता, मासपेशियों में दर्द, पीठ के निचले हिस्से में दर्द, और उदासी की बीमारियाँ होती हैं। इस चक्र का रंग संतरी है।

आसक्ति यह चक्र व्यक्ति के लैंगिक व्यवहार को प्रभावित करता है। इस चक्र के असंतुलित होने पर लैंगिक आसक्ति से पीड़ित होता है। विपरीत लिंग के लिए असाधरण लगाव होता है। वे अपराधी भावना से भरपूर होंगे। भीड़ से दूर रख कर एकांत में रहना पसंद करेंगें । जिस भी व्यक्ति के बारे आसक्ति का विचार आये तुरन्त मन में शिवबाबा या ईष्ट को देखें और कहें आप प्यार के सागर हैं प्यार के सागर हैं। आप तुरंत मन में फूल या पीपल का पेड़ या कोई और पेड़ देखें और कहें आप शांत है शांत है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदीय बालसंस्कार

### स्तनपानाचे महत्त्व

नोकरी व्यवसायानिमित्त अनेक मातांना घराबाहेर पडावे लागते. शिवाय स्त्रीसौंदर्याच्या अति जागरूकतेमुळे अनेक माता शरीर सुडौल दिसावे म्हणून बाळाला स्तनपान करायचे टाळतात. परंतु बाळाच्या विकासासाठी, शारीरिक व बौद्धिक वाढीसाठी मातेचेच दूध श्रेष्ठ असते. म्हणून मातेने दुसरे कोणतेही दूध न पाजता स्वत:चेच दूध बाळाला पाजावे. मातुरेव पिबेत् स्तन्यं तत्परं देह वृद्धये।

११ अष्टांग हृदय उत्तरस्थान १/१५

वाग्भटाचार्यांनी मातेच्या दुधाचे वर्णन करताना सांगितले आहे, की माता ही षडरसयुक्त आहार घेत असल्याने स्तनामध्ये या सहा रसांचे सारभूत भाग आलेले असतात. म्हणून बाळाच्या सर्वांगीण विकासासाठी मातेच्या दुधासारखे दुसरे कोणतेही दूध नाही.

जन्मानंतर बाळाची अंघोळ झाल्यावर पूर्व दिशेला तोंड करून प्रसन्न मनाने स्तनपान द्यावे. स्तनपान करण्याआधी स्तन कोमट पाण्याने स्वच्छ धुऊन व नंतर सुती कापडाने पुसून घ्यावेत, म्हणजे बाळाला कोणत्याही प्रकारचा जंतुसंसर्ग होणार नाही, तसेच कोमट पाण्यामुळे दुग्धवाहिन्यांतील दूध सुटायला मदत होते व बाळाला दूध ओढण्यास सोपे जाते.

प्रथमत: स्तनपानासाठी उजवा स्तन बाळाला द्यावा व त्यानंतर डाव्या स्तनाने स्तनपान करावे. जन्मानंतर प्रथम स्तनपान लवकर सुरू करावे, ज्यामुळे माता व बाळ यांच्यात जवळीक निर्माण होऊन स्तन्यउत्पत्ती लवकर सुरू होते. मातेचे दूध पिणे हा बाळाचा जन्मसिद्ध हक्क आहे, तर बाळाला दूध पाजणे हे मातेचे निसर्गदत्त कर्तव्य आहे.

**मातेच्या स्तनपानातील पोषक घटक : –**

नार्यास्तु मधुरं स्तन्यं कषायानुरसं हिमम् ।
नस्याश्चोतनयोः पथ्यं जीवनं लघु दीपनम् ।।

सुश्रुत सूत्रस्थान ४५/५७

मातेचे दूध हे जास्त मधूर रसाचे, थोडे कषाय रसाचे असून, शीतवीर्यात्मक, पथ्यकर, जीवनीय, लघु आणि दीपन करणारे आहे. डोळ्यांसाठी हितकर व बलवर्धक आहे.

बाळाच्या जन्मानंतर पहिल्या अथवा दुसऱ्या दिवशी घट्ट, चिकट, पिवळसर रंगाचे जे दूध येते. त्याला 'कोलोस्ट्रम' असे म्हणतात. हे कोलोस्टम नवजात बाळाच्या आरोग्यासाठी अत्यत पोषक असते. या चिकामुळे (कोलोस्ट्रम) बाळात रोगप्रतिकारशक्ती निर्माण होते, म्हणून हा चीक काढून न टाकता तो बाळाला पाजणे हिताचे असते. आईच्या दुधात रोगप्रतिकारक अंश, जीवनसत्त्वे, प्रोटीन्स व बाळाबद्दलची प्रेमभावना असते. काही सूतिकेचे नातेवाईक हा चीक काढून टाकतात, परंतु जन्मानंतर निर्माण होणारा चीक हा बाळाला दीर्घायुष्य मिळण्यासाठी, अनेक रोगांपासून त्याचे संरक्षण करण्यासाठी फार उपयोगी असतो. ज्या बाळांना हा चीक मिळत नाही, त्यांची रोगप्रतिकारशक्ती कमी असते. चीक म्हणजे एक प्रकारची नैसर्गिक रोगप्रतिकारक लसच असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जैन आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास

## ललित गांधी यांचे प्रतिपादन; आनंदधाम येथे जैन महासंमेलनास प्रतिसाद






धार्मिक परीक्षा बोर्ड आनंद धाम येथे श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन, अखिल भारतीय जैन अल्पसंख्यांक महासंघ व अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व जैन संघटना आयोजित महा संमेलनात महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा., सेवाभावी अलोकऋषीजी म.सा., नामदार ललित गांधी, अल्पसंख्यांक योजना ऑलइंडिया जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय अध्यक्ष कांतीकुमार जैन.

नगर – जैन समाज व जैन धर्माच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र सरकारने जैन आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. जैन समाजासाठी स्वतंत्र महामंडळ करणारे महाराष्ट्र राज्य हे पहिले व एकमेव राज्य आहे. जैन आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून धार्मिक संरक्षण, तीर्थक्षेत्र विकास जैन धर्मग्रंथांचे जतन व पुनर्निमान करणे, साधुसंतांसाठी विहार धाम निर्माण करणे, युवकांना व्यापार उद्योगासाठी बिनव्याजी कर्ज, परदेशी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना, महिला बचत गटांसाठी ५० लाखांपर्यंत कर्ज, प्रधानमंत्री आवास योजनेमार्फत बिनव्याजी गृह कर्ज, निराधार व विधवा महिलांसाठी तीन हजार रुपये मासिक पेन्शन या आर्थिक विकास महामंडळाला २०० कोटींचा दरवर्षी निधी मिळणार आहे. तसेच एचडीएफसी बँक, बँक ऑफ बडोदा, कोटक बँक, पंजाब नॅशनल बँक अशा अनेक बँकांनी जैन समाजातील व्यापार व उद्योगासाठी २००० कोटींपर्यंत निधी देण्याची तयारी दर्शवली आहे. अशा विविध योजनांमधून जैन आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास होणार आहे. सरकारने जैन समाजासाठी शक्तिशाली महामंडळाचे निर्माण केले आहे, असे प्रतिपादन जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री ललित गांधी यांनी केले आहे.

धार्मिक परीक्षा बोर्ड आनंद धाम येथे श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन, अखिल भारतीय जैन अल्पसंख्यांक महासंघ व अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व जैन संघटना आयोजित महा संमेलनात महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा., सेवाभावी अलोकऋषीजी म.सा., नामदार ललित गांधी, अल्पसंख्यांक योजना ऑलइंडिया जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय अध्यक्ष कांतीकुमार जैन, श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा, राष्ट्रीय उपाध्यक्ष सतीश लोढा, राष्ट्रीय समन्वयक ईश्वर बोरा, राष्ट्रीय संचालक राजेंद्र बलदोटा, पेमराज बोथरा, राजेंद्र चोपडा, सुभाष मुथा, संतोष गांधी, सुरेंद्र गांधी, अनिल कटारिया, संजय कोठारी, नंदकुमार भटवेरा, रमेश लोढा, समीर बोरा, नितीन पटवा, रोशन चोरडिया, पवन कटारिया, शरद शिंगवी, गौतम मुनोत महाराष्ट्र चतुर्थ झोन पदाधिकारी धनेश कोठारी, धनराज संचेती, सुनील मालू, सचिन कटारिया, ईश्वर भंडारी, सुदर्शन डुंगरवाल, पोपट लोढा, संस्था प्रमुख डॉ. प्रकाश कांकरिया, ॲड. नरेश गुगळे, किरण भंडारी, अमित मुथा, रवींद्र बाकलीवाल, तुषार कर्नावट, हर्षल बोरा, नितीन शिंगवी, रसिकलाल बोरा, संतोष गांधी, प्रतीक बोगावत, पोपट लोढा, कमलेश गुंदेचा, चंदन भळगट, सचिन देसर्डा, नितीन बाफना, महेश चुत्तर, अशोक गांधी, बालचंद गांधी, कमलेश चोरडिया, तुषार सुरपुरीया, कुणाल भंडारी, पोपट भंडारी, धनंजय गांधी, ॲड. रोहित बलदोटा, राजेश बाठीया, नितीन भंडारी, विजय गुगळे, मनीष शिंगवी, अरुण दुगड, ज्योती गांधी, लता कटारिया, सरोज कटारिया, डॉ.सुधाताई कांकरिया, वैशाली चोपडा, नूतन गांधी, अपेक्षा संकलेचा, मनीषा मुनोत, सिमरन मुनोत, प्रतिभा गांधी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात वसंत लोढा म्हणाले, जैन समाजातील बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून त्या माध्यमातून विविध योजना जाहीर केलेल्या आहेत. या महासंमेलनात जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. शैक्षणिक कर्ज, शिष्यवृत्ती, स्वयंरोजगार कर्ज, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरणासाठी कर्ज सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या योजनांचा जैन समाज बांधवांनी लाभ घ्यावा. या योजना समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहेत. जैन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शहरात व तालुक्यात प्रत्येक ठिकाणी जैन अल्पसंख्यांक योजनांच्या माहितीसाठी कार्यालय उभारण्यात येणार आहे.

यावेळी कांतीकुमार जैन, ॲड.नरेश गुगळे, राजेंद्र चोपडा यांनी मार्गदर्शन केले. ईश्वर बोरा यांनी स्वागत केले. सूत्रसंचलन राजेंद्र बलदोटा व संतोष गांधी यांनी केले. सतीश लोढा यांनी आभार मानले. आनंद गुरुभक्त मंडळाने गौतम प्रसादाची व्यवस्था केली होती. या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील जैन समाज बांधव उपस्थित होते.



जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे ललीत गांधी व राष्ट्रीय अध्यक्ष कांतीकुमार जैन यांनी आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या आनंदधाम येथील स्मृतीस्थळास भेट देऊन दर्शन घेतले. याप्रसंगी उद्योजक पेमराज बोथरा, संयोजक वसंत लोढा, सतिष लोढा आदी.

# अर्थ सेवेबरोबरोच सामाजिक बांधिलकी जपणारी पतसंस्था : ललित गांधी



सहकारमहर्षि सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेने सुरू केलेल्या पाणपोईचे उद्‌घाटन करण्यात आले.

नगर – सहकारमहर्षि सुवालालजी गुंदेचा यांची सामाजिक बांधिलकीमधून तळमळीने कार्य करण्याची पध्दती जवळून पहाण्याचे भाग्य मला लाभले, त्याचबरोबर पतसंस्थेने पाणपोई उभारुन अर्थसेवेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपली. सामाजिक बांधिलकीमधून सुरू करण्यात आलेला पाणपोईचा उपक्रम कौतुकास्पद आहे. सुवालालजी गुंदेचा यांच्या नावाने पतसंस्था कार्यरत आहे. त्यांनी आखून दिलेल्या शिस्तबद्धतेने पतसंस्थेचे कार्य सुरू आहे, हे अहवाल पाहून लक्षात आले. खुप समाधान वाटले. चांगल्या योजना राबवल्या आणि चांगल्या सेवा दिल्या तर भरभराट निश्चितच होते, हे आपल्या पतसंस्थेने दाखवून दिले आहे. पतसंस्थेचे हे कार्य आदर्शवत आहे, असे जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले. येथील कापडबाजारलगत असलेल्या सहकारमहर्षि सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेने सुरू केलेल्या पाणपोईचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष वसंत लोढा, शैलेश मुनोत, चेअरमन समीर बोरा, व्हाईस चेअरमन अभय पितळे, संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, विनित बोरा, शरद गोयल, तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे, सीए परेश बोरा, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, तसेच सभासद प्रमोद डागा, प्रतीक बोगावत, कुणाल भंडारी, जैन ओसवाल युवक संघ, जय आनंद महावीर युवक मंडळाचे कार्यकर्त्यांसह सभासद उपस्थित होते.

चेअरमन समीर बोरा यांनी स्वागत केले. संचालक संतोष गांधी यांनी प्रास्ताविक करताना जैन समाज बांधवांना शासनाच्या अल्पसंख्याकांसाठी असलेल्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ललित गांधी अथक परिश्रम घेत आहेत. या सामाजिक कार्यासाठी त्यांना पतसंस्थेच्या माध्यमातून सदैव सहकार्य केले जाईल. व्हाईस चेअरमन अभय पितळे यांनी आभार मानले.

# वाडियापार्क येथे भगवान महावीर चषक परिवाराच्यावतीने महावीर कप स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

## पहलगाम हल्ल्यातील मृतकांना श्रद्धांजली



वाडिया पार्क येथे भगवान महावीर चषक परिवाराच्यावतीने महावीर कप स्पर्धेला उत्साहात प्रारंभ झाला. (छाया – लहू दळवी)

नगर – शहरातील वाडिया पार्क मैदानावर भगवान महावीर चषक परिवाराच्या वतीने गेल्या १६ वर्षांपासून सुरु असलेल्या महावीर कप २०२५ च्या विविध क्रीडा स्पर्धेला उत्साहात प्रारंभ झाला. या स्पर्धा २३ एप्रिल ते ४ मे दरम्यान चालणार आहे. यामध्ये डे नाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा थरार रंगणार असून १६ संघांनी सहभाग घेतला आहे. त्याचबरोबर रस्सीखेच, बॅडमिंटन, रिले धावणे स्पर्धेला सुरुवात झाली, अशी माहिती माजी नगरसेवक संजय चोपडा यांनी दिली.

सुरुवातीला जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या पाकिस्तानी अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्यात पर्यटकांचा दुर्दैवी मृतकांना भगवान महावीर चषक परिवाराच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आदर्श व्यापारी मित्र मंडळाचे संस्थापक संजय चोपडा, अध्यक्ष राजेंद्र तातेड, राजेंद्र गांधी, अतुल शेटीया, अजय गुगळे, डॉ. सचिन बोरा, अमित पितळे, लक्ष्मीकांत शेटिया, प्रीतम गुंदेचा, उमेश मंत्री, निलेश मंत्री, आनंद पितळे, वर्धमान मुनोत, राहुल शिंदे, राहुल शेटिया, अभी कोके, सुयोग लुणिया, मयूर पितळे, सी.ए आनंद गांधी, प्रीतम पोखरणा, आनंद कटारिया, रुपेश कटारिया, रुपेश भंडारी, सचिन कटारिया, रितेश बोरा, आनंद नाहाटा, अनिल दुग्गड, बापू गांधी, वर्धमान मुनोत, किरण पोखरणा, पावन पोखरणा, निखील गुगळे, सचिन कटारिया, प्रफुल्ल मुथा, विकास सुराणा, प्रवीण शिंगवी, अजय कांबळे आदी परिश्रम घेत आहे.

राजेंद्र गांधी म्हणाले की धकाधकीच्या जीवनामध्ये मनुष्य आपल्या आरोग्याकडे अक्षरशः दुर्लक्ष करत असतात. मात्र स्पर्धेच्या माध्यमातून युवकांमध्ये खेळाची गोडी निर्माण होत असून व्यायामाकडे आकर्षित केले जाते. त्यामुळे आपले आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होते, आदर्श व्यापारी मित्र मंडळ व मॉर्निंग क्रिकेट क्लबचे युवक एकत्रित येत शहरात स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले जाते. या माध्यमातून खेळाडू आपल्या खेळाचे प्रदर्शन करत असतात असे ते म्हणाले.

वाडिया पार्क येथे क्रिकेट स्पर्धे बरोबरच ४०० मीटर धावणे, बॅडमिंटन व रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन केले आहे. या क्रीडा स्पर्धेत सुमारे २००० खेळाडू खेळणार आहेत. या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक १ लाख ११ हजार १११ रुपये, दुसरे पारितोषिक ५१ हजार रुपये, तिसरे पारितोषिक ३१ हजार रुपये दिले जाणार आहे. तसेच प्रत्येक मॅचला मॅन ऑफ द मॅच, बेस्ट बॉलर, बेस्ट फिल्डर, बेस्ट बॅट्समन आदी पुरस्काराने खेळाडूंना सन्मानित केले जाणार आहे. तसेच मॅन ऑफ द सिरीजचा देखील पुरस्कार दिला जाणार असल्याची माहिती आदर्श व्यापारी मंडळाचे अध्यक्ष प्रवीण शिंगवी यांनी दिली.

# विश्वासार्हता, प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता या त्रिसूत्रीमुळे आरोग्य क्षेत्रात सरस्वती हॉस्पिटलने वेगळा ठसा उमटवला

## डॉ.अमोल जाधव यांचे प्रतिपादन



माळीवाडा येथील सरस्वती हॉस्पिटलचा ८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

नगर – आई व बाळाची परिपूर्ण काळजी घेत आरोग्यसेवेत बांधिलकीचा नवा मापदंड निर्माण करणाऱ्या माळीवाडा येथील सरस्वती हॉस्पिटलचा ८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.अमोल जाधव व डॉ.प्राजक्ता जाधव यांनी या कालावधीत सामाजिक जाणीव ठेवून अत्याधुनिक रूग्णसेवा देण्याचा प्रयत्न केला. त्याला नगरसह जिल्ह्यातून रूग्णांचा प्रतिसाद मिळाला आहे. विश्वासार्हता, प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता या त्रिसूत्रीमुळे आरोग्य क्षेत्रात सरस्वती हॉस्पिटलने ठसा उमटवला आहे. आरोग्य सेवेचा हा नंदादीप असाच तेवत राहील, असा विश्वास यानिमित्त डॉ. अमोल जाधव यांनी व्यक्त केला आहे.

डॉ.जाधव यांनी सांगितले की, ८ वर्षांपूर्वी एक ध्येय समोर ठेवून हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवली होती. या काळात नेहमीच सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. मोठ्या महानगरांमध्ये मिळणार्या आरोग्य सुविधा नगरमध्ये तुलनेने कमी दरात उपलब्ध करून दिल्या. हॉस्पिटलच्या प्रवासात सुमारे ६ हजार डिलिव्हरी आणि २० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या आहेत. ९०० पेक्षा अधिक आरोग्य शिबिरे घेतली आहेत. प्रधानमंत्री सुरक्षा मातृत्व योजनेंतर्गत अनेक महिलांच्या मोफत तपासणी केल्या. याशिवाय महिला सक्षमीकरणासाठी जोडी तुझी माझी, दिल ये जिद्दी है, पत्र लेखन, प्रेगनन्सी फॅशन शो, अहमदनगर फॅशन शो असे अनेक उपक्रम राबवून महिलांना निखळ आनंद मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. रूग्णांवर उपचार करण्याबरोबरच त्यांना आनंदी जीवनाचा मंत्र देण्याचा प्रयत्न असतो. रूग्णांना उच्च दर्जाच्या सेवेची हमी देणारे नॅशनल क्रेडीशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स ॲण्ड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (एनएबीएच) या संस्थेचे मानांकन हॉस्पिटलला प्राप्त झाले आहे.

हॉस्पिटलमध्ये प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात तपासणी, वेदन विरहित प्रसूती, किशोरवयीन समुपदेशन, लग्नापूर्वी व गर्भधारणेपूर्वीचे समुपदेशन सल्ला केंद्र, अनियमित पाळी व पीसीओडी उपचार, मेनोपॉज मार्गदर्शन तसेच वंध्यत्व निवारण आदी उपचार सुविधा उपलब्ध आहेत. याशिवाय दुर्बिणीव्दारे शस्त्रक्रिया, टाका विरहीत पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया, शासनमान्य कुटुंब कल्याण व गर्भपात केंद्र, लैंगिक समस्या मार्गदर्शन, कर्करोग निदान व उपचार, सोनोग्राफी व कलर डॉपलर सेंटर, पॅथॉलॉजी लॅब, कॅशलेस सुविधा उपलब्ध आहेत. अत्याधुनिक सोनोग्राफी मशिन सरस्वती हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहे. आधुनिक लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध असल्याने अनेक रूग्णांना याचा लाभ होत आहे. लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रियेमुळे रूग्णाला जास्त दिवस हॉस्पिटलमध्ये डमिट राहण्याची गरज राहत नाही. तसेच तो लवकर आपले दैनंदिन जीवन जगू शकतो. याचाही लाभ रूग्णांना होत आहे.

विविध शाळा, कॉलेज, महिला संस्थांच्या कार्यक्रमांना हजेरी लावून डॉ.जाधव आरोग्याचा व महिला सक्षमीकरणाचा मंत्र देत असतात. स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.प्राजक्ता जाधव यांनी वंध्यत्व निवारणावर विशेष अनुभव मिळवला असून त्याचा अनेक महिलांना लाभ होत आहे. विविध कारणांमुळे सध्या विवाहित जोडप्यांमध्ये वंध्यत्वाचे प्रमाण वाढले आहे. मूल होत नसल्याने दाम्पत्याच्या जीवनात निराशा येते. अशा दाम्पत्यांसाठी हॉस्पिटलमध्ये आवश्यक तपासण्या, समुपदेशनाची विशेष सुविधा उपलब्ध आहे. त्याचा अनेकांना लाभ झाले आहे. अनेक दाम्पत्यांच्या संसारवेलीवर अपत्य सुखाचा फुल फुलले आहे.

आरोग्यसेवेतील आधुनिक तंत्रज्ञान सरस्वती हॉस्पिटलमध्ये आणून त्याव्दारे रूग्णसेवा देण्यावर कायम भर देण्यात आला आहे. या जोडीलाच डॉ.जाधव यांनी आनंदी समाजाच्या निर्मितीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले आहे. आरोग्यसत्ताक चळवळीतून त्यांनी संपूर्ण नगर शहर निरोगी, आरोग्यसंपन्न आणि आनंदी राहिल यादृष्टीने महत्वाचे पाउल उचलले आहे. या अंतर्गत महापालिकेच्या सहकार्यातून विशेष जनजागृती करण्यात आली. कोणताही आजार अंगावर न काढता वेळीच योग्य उपचार, तपासण्या करून घेण्याचे आवाहन ते करतात. आजारावर उपचार करतानाच मुळाच आजार होवूच नये यासाठी जीवनशैलीत कोणते बदल करावेत यासाठीही हॉस्पिटलतर्फे सातत्याने विविध उपक्रमातून जागृती केली जाते.



राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये यशस्वी झालेले जय बजरंग विद्यालयाचे विद्यार्थी. समवेत मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर आदींसह मार्गदर्शक शिक्षक.

# राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये जय बजरंग विद्यालयाचे १० विद्यार्थी राज्य, जिल्हा व केंद्रीय यादीत

नगर – आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालयातील, इ. पहिली ते सातवी पर्यंतचे १० विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ मध्ये वेल्फेअर फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत, विद्यालयाच्या १० विद्यार्थ्यांनी राज्य, जिल्हा व केंद्र यादीत यश मिळवले.

यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे – चि. दर्शन गणेश घुले याने (इ. २ री) त १५० पैकी १४२ गुण मिळवून राज्य यादीत पाचवा क्रमांक पटकावला तर कु. आराध्या कैलास मैहेत्रे हिने (इ.२ री) १५० पैकी १४० गुण मिळवून जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावला. कु. आयुश्री दीपक ढवळशंक हिने (इ. २ री) १५० पैकी १३२ गुण मिळवून जिल्ह्यात पाचवा क्रमांक पटकावला तर चि. ईशान दीपक घुले याने (इ.१ ली) १५० पैकी १२८ गुण मिळवून जिल्ह्यात सातवा क्रमांक पटकावला, कु. अंजली रवींद्र आव्हाड हिने (इ.१ ली) १५० पैकी ११२ गुण मिळवून केंद्रात चौथा क्रमांक पटकावला.

तर कु.शिवन्या गणेश कुसाळकर हिने (इ. २ री) १५० पैकी ११४ गुण मिळवून केंद्रात आठवा क्रमांक पटकावला. चि. सिद्धेश अमोल क्षीरसागर याने (इ. ५ वी) ३०० पैकी २८० गुण मिळवून जिल्ह्यात पाचवा क्रमांक पटकावला, तर चि. अभिषेक प्रभाशंकर कुशवाह (इ.६ वी) याने ३०० पैकी २३८ गुण मिळवून केंद्रात पहिला क्रमांक पटकावला. चि.आदेश अमोल क्षीरसागर (इ.५ वी) याने ३०० पैकी २५० गुण मिळवून केंद्रात चौथा क्रमांक पटकावला. तर कु. श्रावणी संतोष पानकडे (इ.४ थी) हिने ३०० पैकी २४२ गुण मिळवून केंद्रात बारावा क्रमांक पटकावला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सहसचिव उमेश गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर यांनी अभिनंदन केले. तर विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करुन यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# साईबन आणि दिशान अॅडस्‌तर्फे अहिल्यानगरमध्ये निबंध स्पर्धा

नगर – सध्या सुट्ट्यांचे दिवस असून याकाळी वाचन, लेखनाची संधी द्यावी या हेतूने आम्ही निबंध स्पर्धेचे आयोजन केले असून आकर्षक रोख बक्षिसांच्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांसह, पालक आणि नगरकरांनी सहभाग द्यावा, असे आवाहन डॉ. प्रकाश कांकरिया यांनी केले आहे. साईबन (निसर्गाला पडलेलं हिरवं स्वप्न) आणि दिशान अॅडव्हर्टायझिंग यांच्यावतीने ही खुली निबंध स्पर्धा होणार आहे.

विद्यार्थ्यांना सुट्टीत वाचन लेखनाचा आनंद देतांना मोबाईलपासूनही थोडी सुटका मिळेल तसेच लेखनाचीही सवय रहावी व आवडत्या विषयांच्या माध्यमातून चिंतन, मनन व्हावे हा सुध्दा एक उद्देश असल्याचे किशोर गांधी यांनी सांगितले. निबंध स्पर्धेसाठी ३ गट आहेत. सर्वांना दिलेल्या ५ विषयांपैकी एका विषयावर स्वहस्ताक्षरात निबंध लिहून १५ दिवसात साईसूर्य नेत्रसेवा, माणिक चौक येथे आणून द्यावे लागतील.

विद्यार्थ्यांना दिलेल्या कोणत्याही एका विषयात मराठी, हिंदी, इंग्रजी यापैकी एका भाषेत लिहिता येईल. ओपन खुल्या गटातील स्पर्धकांनी मराठीत निबंध लिहावेत. प्रत्येक स्पर्धकाने आपले नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक सुवाच्च अक्षरात लिहावे.

१) इ. ४ थी ते ८ वी – प्रथम पारितोषिक रु. ५००, द्वितीय पारितोषिक रु. ३००, तृतीय पारितोषिक – रु. २००.

२) इ. ९ वी ते १२ वी – प्रथम पारितोषिक रु. ७००, द्वितीय पारितोषिक रु. ५००, तृतीय पारितोषिक – रु. ३००.

३) खुला गट – प्रथम पारितोषिक रु. ११००, द्वितीय पारितोषिक रु. ५००, तृतीय पारितोषिक – रु. ३००. प्रत्येक स्पर्धकाला प्रमाणपत्र दिले जाईल. स्पर्धेसाठी विषय – १) माझे आवडते पुस्तक २) संतांची भूमी अ.नगर जिल्हा ३) अहिल्यानगर – काल, आज आणि उद्या. ४) सोशल मिडिया वापर – दुष्परिणाम ५) भारताची पुढील वाटचाल. या निबंध स्पर्धेत सहभाग द्यावा, असे आवाहन सौ.सुधा कांकरिया यांनी केले. परिक्षणानंतर लगेचच पारितोषिक वितरण होईल, असे सौ. बबिता गांधी यांनी सांगितले.



काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा कौटुंबिक न्यायालय व कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने निषेध नोंदवण्यात आला.

## दहशतवादी हल्ल्यातील मृतांना कौटुंबिक न्यायालयात श्रद्धांजली

नगर – काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा कौटुंबिक न्यायालय व कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने निषेध करण्यात आला. या भ्याड हल्ल्यात बळी पडलेल्या निरपराध नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

कौटुंबिक न्यायालयात झालेल्या श्रध्दांजली कार्यक्रमाप्रसंगी कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती संगीता ना. भालेराव, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष अॅड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष तथा विशेष सरकारी वकील अॅड. सुरेश लगड, सचिव अॅड. राजेश कावरे, अॅड. शिवाजी कराळे, प्रबंधक एस.के. मोहोळकर, सहाय्यक अधीक्षक ए. आय. शेख, कर्मचारी एस.के. चव्हाण, ए.पी. झिंजे, आर.एस. गुंडू, ए.एस. तगारे, आर.ए. मोरे, एस.बी. आळकुटे, एल.एस. जाधव, एस.के. जाधव आदी उपस्थित होते. यावेळी मौन पाळून हल्ल्यात बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. उपस्थितांनी या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध नोंदवून दहशतवादी संघटनांना चोख उत्तर देण्याची मागणी केली.



पहेलगाम दहशतवादी हल्ल्याचा व्यापाऱ्यांकडून निषेध करण्यात आला.

## पहेलगाम दहशतवादी हल्ल्याचा व्यापाऱ्यांकडून निषेध

नगर – पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा अहिल्यानगर व्यापारी महासंघ आणि वंदे मातरम् युवा प्रतिष्ठानतर्फे निषेध करण्यात आला. यावेळी ईश्वर बोरा, कुणाल भंडारी, उत्कर्ष गीते, महावीर कांकरिया, प्रतीक बोगावत यांनी निषेध व्यक्त करुन केंद्र व राज्य सरकारकडे या दहशतवाद्यांविरुद्ध कारवाईची मागणी केली.

आंदोलनात संभव काठेड, ऋषिकेश येवलेकर, केतन मुथा, प्रणित नारंग, लाभेश नारंग, प्रांजल बोगावत, संजय बोगावत, विनीत बोरा, प्रतीक गोयल, मनीष सोनग्रा, अमित सोनग्रा, प्रदीप गोपलनी, तेजस डहाळे, संतोष ठाकूर, विजू आहेर, सौरभ भांडेकर, देवेंद्र भाटेजा, दीपक नवलानी, पवन खिथानी, किशोर तलरेजा, ललित कटारिया, संतोष मिसाळ, देवेंद्र दुधाले, नाथा काका, ओमप्रकाश बायड आदी सहभागी झाले होते. पाकिस्तान मुर्दाबाद, भारत माता की जय, वंदे मातरम आणि जिहादी दहशतवादाचा नाश होवो, अशा घोषणा देण्यात आल्या.

# मुर्दाबाद.. मुर्दाबाद.. पाकिस्तान मुर्दाबाद... घोषणाबाजी करत नगरमध्ये ठाकरेंच्या शिवसेनेने जाळला पाकिस्तानचा झेंडा

### पहेलगाम हल्ला पाकिस्तानचच षडयंत्र, केंद्र सरकारने करारा जवाब देत पाकड्यांची मस्ती जिरवावी : किरण काळे






मुर्दाबाद.. मुर्दाबाद.. पाकिस्तान मुर्दाबाद... घोषणाबाजी करत नगरमध्ये ठाकरेंच्या शिवसेनेने पाकिस्तानचा झेंडा जाळला.

नगर – जम्मू कश्मीरच्या पहेलगाममध्ये निष्पाप भारतीय हिंदू पर्यटकांवर हल्ला करत मृत्यू तांडव घडवून आणणाऱ्या अतिरेक्यांचे, पाकिस्तानच्या झेंड्याचे पोस्टर्स अहिल्यानगर शहर शिवसेना ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र निदर्शने करत जाळण्यात आले. मुर्दाबाद.. मुर्दाबाद.. पाकिस्तान मुर्दाबाद... अशा घोषणा देण्यात आल्या. हा हल्ला पाकिस्तानचेच षडयंत्र आहे. केंद्र सरकारने करारा जवाब देत पाकड्यांची मस्ती जिरवावी, अशी मागणी शहरप्रमुख किरण काळे यांनी केली आहे. मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली. मृत्युमुखींना श्रद्धांजली वाहत पुष्पचक्र अर्पण करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी पादत्राणे काढली नव्हती. या प्रकाराचा देखील शिवसेनेने निषेध केला.

यावेळी जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, शिक्षक सेना जिल्हाप्रमुख प्रा.अंबादास शिंदे, कामगार सेनेचे विलास उबाळे, उपशहर प्रमुख जेम्स आल्हाट, उपशहर प्रमुख दीपक भोसले, किरण बोरुडे, माजी नगरसेवक सुनील त्रिपाठी, माजी नगरसेवक पप्पू ठुबे, सावेडी उपनगराचे उपप्रमुख प्रशांत पाटील, सुनील भोसले, सचिन शेंडगे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकारी शहर जिल्हाध्यक्ष अनिकेत कराळे, महिला कॉंग्रेस शहर जिल्हाध्यक्ष उषा भगत, अल्पसंख्यांक कॉंग्रेस शहर जिल्हाध्यक्ष अनिस चुडीवाला, माथाडी कामगार सेना विभाग शहरप्रमुख गौरव ढोणे, युवासेना विधानसभा प्रमुख आनंद राठोड, किशोर कोतकर, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, अशोक जावळे, आनंद जवंजाळ, केशव दरेकर, गणेश आपरे, महावीर मुथा, अमित शिंदे, विनोद दिवटे, अमोल सानप, रमेश आव्हाड, जयराम आखाडे, नितीन जगधने, महावीर मुथा, महादेव बुरा, दीपक गांगुर्डे, प्रकाश शिंदे आदी उपस्थित होते.

किरण काळे म्हणाले, दहशतवाद्यांनी अगोदर रेकी करून पूर्वनियोजित कट आखून हल्ला घडवून आणला. धर्म विचारून हिंदू असल्याची खात्री करत निष्पापांचे बळी घेतले. ही राजकारण करण्याची वेळ नाही. मात्र मागील अकरा वर्षांपासून हिंदूंचेच सरकार असूनदेखील हिंदुस्थानातील 'हिंदू खतरे मे आहे' हे भयाण वास्तव आहे. संपूर्ण देशामध्ये संतापाची लाट उसळली आहे. अनेक ठिकाणी चेक पोस्टवर बंदोबस्तच नव्हता, असे पर्यटक सांगत आहेत. केंद्रीय गुप्तचर यंत्रणा कट शिजत असताना काय करत होत्या? पुलवामा हल्ल्यावेळी देखील यंत्रणा अपयशी ठरल्या होत्या. पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षण मंत्री, परराष्ट्रमंत्री यांना प्रचंड संरक्षण, कडेकोट बंदोबस्त आहे. तसंच संरक्षण सामान्य भारतीयांना केव्हा मिळणार? असा संतप्त सवाल काळे यांनी केला आहे.

पुढे ते म्हणाले, पाकिस्तानचे उत्तर छप्पन इंचाच्या छातीने दिले पाहिजे. एवढा मोठा देशाच्या सुरक्षेवर हल्ला झाला तरीदेखील बिहारमध्ये राजकीय धुरळा सुरूच आहे. ती प्रक्रिया स्थगित केली पाहिजे. आयपीएलचा उत्सव बंद करून तिथे बंदोबस्तासाठी तैनात असणाऱ्या हजारोंच्या संख्येची पोलीस फौज जम्मू-काश्मीरमध्ये संरक्षणासाठी धाडली पाहिजे. केंद्र सरकारने याबाबत ठोस कारवाई करावी.

अहिल्यानगर शहरातील तृतीयपंथी समाजाचे अध्यक्ष काजल गुरु यांच्यासह जिल्ह्यातील काही पर्यटक श्रीनगरमध्ये अडकले आहेत. त्यांना लवकर अहिल्यानगरमध्ये सुखरूप आणण्यासाठी प्रशासन, राज्य सरकारने तातडीने पावले उचलण्याची मागणी किरण काळे यांनी केली आहे.

राजेंद्र दळवी म्हणाले, महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी पुरविण्यात आलेल्या विशेष विमानांचा खर्च हा राज्य सरकारला करावा लागला. केंद्र सरकारने अशा कठीणप्रसंगी तरी महाराष्ट्रातील पर्यटकांना सपत्नीक वागणूक द्यायची नव्हती.

राष्ट्रवादीचे अनिकेत कराळे म्हणाले, हा हल्ला कुठल्या राज्याच्या नागरिकांवर नसून भारतीयांवर, देशाच्या सार्वभौमत्वावर भ्याड हल्ला आहे.

कॉंग्रेसच्या उषा भगत म्हणाल्या, एक महिन्यांनी अमरनाथ यात्रा सुरू होणार आहे. त्याआधी घडलेल्या या हल्ल्यामुळे भाविक, पर्यटकांमध्ये अत्यंत भीतीचे वातावरण आहे. केंद्र सरकारने जोरदार प्रत्युत्तर द्यावे.

# धर्मांधतेने दहशत पसरविणाऱ्यांना मुळापासून उखडून टाका : अॅड. राजेश कातोरे

### काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याचा जिल्हा न्यायालयात निषेध; शहर बार असोसिएशनच्यावतीने बळी पडलेल्या निरपराध नागरिकांना श्रद्धांजली



काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा शहर बार असोसिएशनच्या वतीने जिल्हा न्यायालयात निषेध करण्यात आला.

नगर – काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा शहर बार असोसिएशनच्या वतीने जिल्हा न्यायालयात निषेध करण्यात आला. या भ्याड हल्ल्यात बळी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. न्यायालय परिसरात झालेल्या शोकसभेला शहर बार असोसिएशनचे पदाधिकारी व वकील वर्ग उपस्थित होते.

शोकसभेत शहर बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. राजेश कातोरे, विशेष सरकारी वकील अॅड. सुरेश लगड, लायर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे अॅड. रावसाहेब बर्डे, व्हाईस चेअरमन अॅड. विनायक सांगळे, अॅड. अनिता दिघे, खजिनदार अॅड. अनुराधा येवले, अॅड. रघुनाथ शेळके, बी.एन. भालसिंग, अॅड. भगवान कुंभकर्ण, अॅड. अक्षय काळे, अॅड. अतिश निंबाळकर, अॅड. करूणा शिंदे, अॅड. बाळकृष्ण शेडाळे, अॅड. गौरी लोखंडे, अॅड. सुरेश कोहकडे, अॅड. बहिरू जरे, अॅड. आदित्य घालमे, अॅड. बी.जी. खेडकर, अॅड. आनंद सूर्यवंशी, अॅड. सुजाता बोडखे, अॅड. भागा गुंजाळ, अॅड. अजिंक्य काळे, अॅड. रवींद्र रूपसिंग, अॅड. एस.ए. कोतकर, अॅड. रफिक बेग, अॅड. विनायक सांगळे, अॅड. सतीश चौधरी, अॅड. प्रज्ञा उजागरे, अॅड. अभिषेक म्हस्के, अॅड.हर्षद काकडे, अॅड. गौरव दांगट, अॅड. ए.आर. मोकाटे आदींसह वकील उपस्थित होते.

सर्वांनी मौन पाळून हल्ल्यात बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. शोकसभेत बोलताना अॅड. राजेश कातोरे म्हणाले की, धर्माच्या नावावर निष्पाप नागरिकांचे प्राण घेणे ही अधार्मिक वृत्ती असून अशा अमानुष कृत्यांचा तीव्र निषेध व्हायला हवा. या हल्ल्याच्या सूत्रधारांना शोधून जशास तसे उत्तर दिले गेले पाहिजे. धर्मांधतेच्या नावावर अशा घटना घडवणाऱ्यांना मुळापासून उखडून टाकणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

अॅड. सुरेश लगड म्हणाले, पाकिस्तानसारखे शत्रूराष्ट्र दहशतवादी संघटनांना पाठीशी घालून भारताच्या अखंडतेला सुरुंग लावत आहे. हा भ्याड हल्ला म्हणजे मानवतेवर झालेला घात आहे. अॅड. अनिता दिघे म्हणाल्या की, फक्त श्रद्धांजली वाहून उपयोग नाही, आता वेळ आली आहे थेट उत्तर देण्याची. भारताचे नागरिक अशा भ्याड हल्ल्यांना घाबरत नाहीत. धर्म विचारून मारणाऱ्यांना आता तितक्याच कठोरतेने उत्तर देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

२४ एप्रिलला महाराष्ट्रातील सर्वच न्यायालयात काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध नोंदवून, बळी गेलेल्या नागरिकांना श्रध्दांजली वाहण्यात आली आहे. यावेळी सर्व वकिलांनी एकमताने केंद्र सरकारकडे दहशतवादी संघटनांविरोधात कठोर भूमिका घेण्याची मागणी केली. देशाच्या अखंडतेवर आणि शांततेवर घाला घालणाऱ्या शक्तींना माफ करता कामा नये, असा सूर यावेळी उमटला.

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २७ एप्रिल रोजी मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २७ एप्रिल रोजी मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत होणाऱ्या या शिबिरात कॅन्सर सर्जन डॉ.अनिकेत शिंदे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. हॉस्पिटलमध्ये कॅन्सरवर अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध असून जास्तीत जास्त रूग्णांना त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात तोंडाचा, स्तनाचा, फुफ्फुसाचा, आतडे, लिव्हर, स्वादुपिंड, गर्भाशय इत्यादी कॅन्सर तपासणी करण्यात येईल. हॉस्पिटलमध्ये रेडिएशन थेरपी आणि केमोथेरपी उपचार व मार्गदर्शन उपलब्ध आहे. कॅन्सरचे वेळीच अचूक निदान झाल्यास रूग्ण पूर्ण बरा होवू शकतो. यासाठी योग्य तपासणी व निदान महत्वाचे असते. त्यादृष्टीने शिबिरात रूग्णांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनव्दारे सेवा उपलब्ध आहे. डिजिटल एक्स रे २५० रुपये, सोनाग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये तर एमआरआय २५०० रुपयांत केले जाते. याशिवाय आनंदऋषीजी ब्लड बॅंक सेवा २४ तास उपलब्ध आहे. शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क – ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६




काश्मीरमधील पहेलगाम येथे हिंदू पर्यटकांवर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हिंदू बंधू, भगिनींना अहिल्यानगर शहर भाजपाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

## पहलगाम हल्ल्यातील हिंदू बंधू भगिनींना शहर भाजपाची श्रद्धांजली वाहून घटनेचा केला निषेध

नगर – काश्मीरमधील पहेलगाम येथे हिंदू पर्यटकांवर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हिंदू बंधू, भगिनींना अहिल्यानगर शहर भाजपाच्या वतीने श्रद्धांजली वाहून या हल्ल्याचा निषेध करण्यात आला. बुधवारी सायंकाळी शहरातील चौपाटी कारंजा चौकातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यापुढे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी श्रद्धांजली वाहिली.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अॅड.अभय आगरकर, सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, वसंत लोढा, दामोदर बठेजा, बाळासाहेब गायकवाड, मयूर बोचूघोळ, कुणाल भंडारी, विलास नंदी, गोकुळ काळे, राजेंद्र काळे, महेश नामदे, तुषार पोटे, सागर शिंदे, प्रवीण ढोणे, राहुल जामगावकर, गोपाल वर्मा, अनिल सबलोक, कालिंदी केसकर, श्वेता पंधाडे, रेणुका करंदीकर, रेखा आहेर आदी उपस्थित होते.

यावेळी अॅड.अभय आगरकर म्हणाले, पाकिस्तानमधील अतिरेक्यांनी क्रूरतेने हिंदू बंधू, भगिनींची हत्या केली आहे. अशा दहशतवादी प्रवृत्ती वेळीच ठेचल्या पाहिजेत. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा हे नक्कीच योग्य कारवाई करून या घटनेचा बदला घेतील. हिंदू समजाविरोधात या अपप्रवृत्ती वाढत आहेत. त्यांना केंद्र शासन निश्चित पायबंद घालेल, असा विश्वास व्यक्त करून मृतांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी राजेंद्र काळे, दामोदर बठेजा, प्रिया जानवे आदींनी या घटनेचा निषेध केला.

## पीठ गिरणी संघटनेची २६ एप्रिल रोजी वार्षिक सभा

### सर्व गिरणी चालक, मालक व कारागीर यांना हजर राहण्याचे आवाहन : अध्यक्ष रामकिशन सुपेकर

नगर – अ.नगर महानगरपालिका हद्दतील पीठ गिरणी संघटनेची वार्षिक सभा २६ एप्रिलला संध्याकाळी ६ वाजता दत्त मंदिर, पाईपलाईन रोड, पेट्रोल पंपा जवळ, वाणीनगर कमानी जवळ, मोरया मंगल कार्यालय शेजारी आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेसाठी गिरणी चालक, मालक व कारागीर यांनी हजर रहावे व पास असणारेच गिरणीवाले यांना बरोबर घेऊन यावे, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष रामकिशन सुपेकर यानी केले आहे.

सभेमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार असुन त्या मध्ये प्रामुख्याने प्रीपेड मीटर, भाव वाढी, घर घंटीचा बंदोबस्त, आपसातील मतभेद मिटविण्यावर चर्चा करणे. गिरणी व्यावसायिक यांच्या अड्‌चणी असतील तर ती जाणुन घेऊन ती सोडवणे व सभासदांनी ऐनवेळी सुचविलेल्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. या सभेमध्ये गिरणी चालक, मालक व कारागिर यांनी हजर रहावे, असे आवाहन सचिव वैभव मुळे यांनी केले.

यावेळी मार्गदर्शक पंडित खरपुडे, कार्याध्यक्ष अकबर पठाण, उपाध्यक्ष अरुण गिरम, चंद्रकांत ताठे, सहसचिव बजरंग गव्हाणे, समीर पठाण, खजिनदार वीरेंद्र शिंदे, संघटक शंकर म्हस्के, गणेश अडसरे, सल्लागार हाजी ज़मीर शेख, सदस्य मुश्ताक शेख हजर राहणार आहेत.



पहेलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ अहिल्यानगर प्रोफेसर चौक संभाजी पुतळा या ठिकाणी हिंदुत्वनिष्ठ संघटनेच्यावतीने निषेध प्रदर्शन करण्यात आले. यावेळी बापू ठाणगे, सुमित वर्मा, प्रतिक्षा कोरगावकर, बाळासाहेब (नाना) भोरे उपस्थित होते.

## 'वकील आघाडी'कडून पहेलगाम हल्ल्याचा निषेध

नगर – जम्मू-काश्मीर येथील पहेलगाम येथे दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांवर भ्याड हल्ला करत अनेक भारतीय नागरिकांवर बेछूट गोळीबार केला. यामध्ये २६ लोकांचा बळी गेला तर अनेक पर्यटक जखमी झालेले आहेत. अशा दहशतवादी हल्ल्याचा भाजपा वकील आघाडीकडून जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी आघाडीचे अध्यक्ष अॅड. चंदन बारटक्के, अॅड. संदीप काळे, अॅड. संदीप शेळके, अॅड. वर्धमान भंडारी, अॅड. अमित गाडेकर, अॅड. सचिव घावटे, अॅड. पोपट पालवे, अॅड. रविंद्र लगड, अॅड. अविनाश साखला, अॅड. देवेंद्र बंब, अॅड. व्यंकटेश शिरसुल, अॅड. हरिश कल्याणी आदी उपस्थित होते.

# सिव्हिल हडको येथील ओढ्यामध्ये मैलामिश्रित पाणी सोडल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## ड्रेनेजचे पाणी बंद न झाल्यास महापालिकेसमोर उपोषणाला बसणार, आयुक्तांनी केली ओढ्याची पाहणी


सिव्हिल हडको येथील मैलामिश्रीत ओढ्याची नागरिकांबरोबर पाहणी करताना आयुक्त यशवंत डांगे.

नगर – सिव्हिल हडको येथील ओढ्यामध्ये नागरिकांनी मैल मिश्रित पाणी सोडल्यामुळे सिव्हिल हडको येथील ओढ्या शेजारी मोठ्या प्रमाणात नागरिक राहत असून त्यांना तेथे दुर्गंधीचे साम्राज्य व डास मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्यामुळे सोडलेले ड्रेनेजचे पाणी बंद करण्याच्या मागणीसाठी मनपा आयुक्त यांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाची दखल घेत मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी तत्काळ दखल घेत सिव्हिल हडको भारत चौक येथील ओढ्याची पाहणी करून नागरिकांना या समस्येतून मार्ग काढू असे आश्वासन दिले. यावेळी प्रशांत सराईकर, राजेंद्र कचरे, अशोक कर्डिले, विजय आवटी, मुकुंद पालवे, अक्षय सूर्यवंशी, शेखर शेंडे, प्रकाश मारवाडे, उमेश पाठक, शिवम देवगुणे, अमित कचरे, राहुल दरेकर, संजय कचरे, रमेश कांबळे, दिलीप हातवळणे, श्रीकांत नाईक, अलका गाडे, शोभा रणखांब, यशोदा राठोड, उमा सुंबे आदीसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

सिव्हिल हडको परिसरात मोठी रहदारी असून पारिजात चौक पाईपलाईन रोड येथील नागरिकांनी ड्रेनेज लाईनचे पाणी ओढ्यामध्ये सोडल्याने मोठा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सिव्हिल हडको परिसरात राहणाऱ्या नागरिकांना डेंग्यू, मलेरिया सारखे आजार मोठ्या प्रमाणात होत आहे. ओढ्यामध्ये सोडलेल्या ड्रेनेजच्या पाण्याची योग्य प्रमाणे विल्हेवाट लावून नागरिकांनी सदरचे मैल मिश्रित पाणी ओढ्यात सोडलेले बंद करून त्यांना ड्रेनेजची स्वतंत्र लाईन टाकण्यात यावी अशी मागणी सिव्हिल हडको येथील नागरिकांनी महापालिकेच्या आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे केली आहे. ७ दिवसांमध्ये ओढ्यामधील ड्रेनेज लाईनचे पाणी बंद न केल्यास महापालिकेसमोर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

# ‘स्टँड अप इंडिया’ योजनेंतर्गत १८ वर्षांवरील नवउद्योजकांना मार्जीन मनीच्या माध्यमातून मदत

नगर – जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील १८ वर्षांवरील नवउद्योजकांना केंद्र शासनाच्या ‘स्टँड अप इंडिया’ योजनेत मार्जीन मनी योजनेंतर्गत समाजकल्याण विभागाकडून एकूण प्रकल्प मूल्याचे १५ टक्के अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे, अशी माहिती समाजकल्याण सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी दिली आहे.

या योजनेतून पात्र लाभार्थ्यांना उद्योजकता विकासासाठी १० लाखांपासून १ कोटी रुपये पर्यंत कर्ज मिळू शकणार आहे. या योजनेसाठी अर्जदार किमान १८ वर्षांचा असावा. लाभार्थीने अनुसूचित जाती अथवा नवबौद्ध समाजातील असणे आवश्यक असून, ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट किंवा अन्य नवीन उद्योग प्रकल्पासाठी कर्ज घेता येईल. व्यवसाय मॅन्युफॅक्चरिंग किंवा सेवा क्षेत्रातील असावा. जून्या व्यवसायासाठी अर्जदार कर्ज घेऊ शकणार नाही.

योजनेत लाभार्थ्यांला एकूण प्रकल्प मूल्याच्या १० टक्के रक्कम स्वतः गुंतवावी लागेल. अर्जदारास प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ७५ टक्क्यांपर्यंत कर्ज मिळू शकते. उर्वरित १५ टक्के रक्कम समाज कल्याण विभागाकडून अनुदान स्वरूपात उपलब्ध करून दिली जाईल. अर्ज ऑनलाईन पद्धतीने www.standupmitra.in या संकेतस्थळावर करता येईल, तसेच जवळच्या बँकेत किंवा जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक यांच्यामार्फतही ऑनलाईन अर्ज करता येईल.

या योजनेविषयी अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अहिल्यानगर (डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सावेडी नाका, नगर– मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर, पिन –४१४००३) येथे संपर्क साधावा, असे आवाहनही श्री.कोरंगटीवार यांनी केले आहे.

# महानगरपालिकेतील ‘ऑनलाईन प्लॅन मंजुरी’साठी संगणक प्रणालीविषयी विस्तृत माहितीबाबत कार्यशाळा


आर्किटेक्ट इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर आणि पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ऑटो डि सी आर या नव्याने ऑनलाइन प्लॅन मंजुरीसाठी समाविष्ट करण्यात आलेल्या संगणक प्रणालीविषयी विस्तृत माहिती देताना इम्रान पठाण. (छाया – लहू दळवी)

नगर – शासनाने ऑनलाईन प्लॅन मंजुरी आणि संबंधित गोष्टीसाठी संगणक प्रणालीला मान्यता दिली असून, यामार्फत जलद गतीने संबंधित कामे करणे सुकर व्हावे, हा यामागील हेतू आहे. ऑटो डीसीआर ही संगणक प्रणाली सोपी असून, यावर ड्रॉईंगचे ट्रेसींग काढणे आणि इतर डाटा फिडींग जलद गतीने शक्य आहे तसेच कंपनीचे प्रतिनिधी यात काम करताना येणाऱ्या अडचणीत मदत करण्यास उपलब्ध असून, दर बुधवारी ऑनलाईन डेमो सेशन आयोजित केले जात आहे. त्याची लिंक सभासदांना ग्रुपवर पाठवली जात असल्याचे ऑटो डी सी आरचे सपोर्ट अधिकारी इम्रान पठाण यांनी सांगितले.

आर्किटेक्ट इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर आणि पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ऑटो डि सी आर या नव्याने ऑनलाइन प्लॅन मंजुरीसाठी समाविष्ट करण्यात आलेल्या संगणक प्रणालीविषयी विस्तृत माहिती देण्यात आली. यावेळी संतोष खांडेकर, मयुरेश देशमुख, प्रदिप तांदळे, सुनिल औटी, नंदकिशोर घोडके, संजय चांडवले, विजयकुमार पादिर, विकार काझी, नितिन कोरडे, रत्नाकर कुलकर्णी, कैलास ढोरे, दादासाहेब बेरड आणि सभासद उपस्थित होते.

यावेळी ऑटो डी सी आर या संगणक प्रणालीचा वापर करून महापालिका नियमाप्रमाणे प्लॅन मंजुरीसाठीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यावेळी ऑटो डी सी आरचे सपोर्ट अधिकारी गणेश म्हस्के आणि इम्रान पठाण यांनी या प्रात्यक्षिकाची विस्तृत माहिती दिली. यामध्ये ऑटो डी सी आर ची वेबसाईट आणि सॉफ्टवेअर संगणकावर इन्स्टॉल करणे, टेक्निकल पर्सन, रजिस्ट्रेशन करणे, ओनर रजिस्ट्रेशन, प्रोजेक्टची डाटा एन्ट्री करणे, प्लॅन ड्रॉईंगचे ट्रेसींग काढणे आणि सर्व कागदपत्रे व ड्रॉईंग सबमिट करणे या सर्वांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

यावेळी संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांनी सांगितले की, पूर्वी महापालिका हद्दीत प्लॅन सबमिट करणे, ले आऊट, सब डीव्हिजन अथवा तत्सम इतर सर्व मंजुरीसाठी बी पी एम एस ही एकच संगणक प्रणाली उपलब्ध होती. त्यावेळी या सिस्टिममध्ये काही अडचणी आल्या अथवा अपडेटसाठी सिस्टिम बंद असेल तर प्लॅन मंजुरी आणि इतर कामासाठीची सर्व यंत्रणा ठप्प होत असे. ऑटो डी सी आर प्रणालीमुळे आणखी एक पर्याय उपलब्ध झाला असून, महापालिका, टी पी हद्दीत काम करणारे नोंदणीकृत अभियंते आणि वास्तू विशारद यांना आणखी एक पर्याय उपलब्ध झाला असून, काम करणे सोपे झाले आहे. यासाठी वेळोवेळी ऑटी डी सी आर कंपनीचे प्रतिनिधी आपल्या संस्थेच्या सभासदांना ट्रेनिंग देणार असल्याचे व आपण त्यासाठी डेमो प्रात्यक्षिके आयोजित करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्था सभासद आणि कंपनीचे सपोर्ट ऑफिसर असलेले इंजि. गणेश म्हस्के यांनी या प्रणालीचे प्रात्यक्षिक सादर करून सभासदांच्या विविध शंकांचे निरसन केले. प्रदिप तांदळे यांनी सूत्रसंचालन केले.


श्री क्षेत्र धरमपुरी परिसर येथे स्वच्छता अभियान राबविताना छत्रपती अभियांत्रिकीचे विद्यार्थी.

# छत्रपती अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी राबविले श्री क्षेत्र धरमपुरी परिसरात स्वच्छता अभियान

नगर – ’जिथे स्वच्छता असे, तिथे आरोग्य वसे’ हे ब्रीद घेवून नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी २३ एप्रिल रोजी श्री क्षेत्र धरम पुरी, निंबळक जवळचा परिसर या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविली. ‘परिसर स्वच्छ ठेवाल तर निरोगी व्हाल’, असा स्वच्छतेचा मंत्र राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सतत कानावर पडत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी या स्वच्छता अभियानामध्ये धरमपुरी मंदिरा नजदीकच्या परिसरातील कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. या मोहिमेमध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांनी स्वच्छतेच्या विविध घोषणा देत सहभाग नोंदवला.

आरोग्यासाठी, पर्यावरणासाठी आणि समाजासाठी आवश्यक असणारी स्वच्छता ही सवय विद्यार्थ्यांनी अंगीकारली तर शालेय व सामाजिक जीवनात त्याचा फायदा होऊन शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी व्यक्त केले.

स्वच्छता अभियान यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे, प्रा. अमोल कोल्हापुरे व प्रा. शीतल शेरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा. पी. जी. निकम (सिव्हील विभागप्रमुख), डॉ. एम. के. भोसले (प्रथम वर्ष समन्वयक), प्रा. एस. एम. वाळके (ई अ‍ॅण्ड टी सी विभाग प्रमुख), प्रा. ए. बी. काळे (मेकॅनिकल विभागप्रमुख), प्रा. एस. पी. विधाते (कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख), डॉ. व्ही. व्ही. पाटील (ए.आय. विभागप्रमुख) आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.


रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेने मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

# राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचा डंका

**राज्य गुणवत्ता यादीत १५, जिल्ह्यात २९, शहरात ९४ विद्यार्थी यशस्वी**

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेने मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. यात शाळेतील तब्बल १३८ विद्यार्थ्यांनी यश मिळवले असून, त्यातील १५ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत, २९ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आणि ९४ विद्यार्थी शहर गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, अभिषेक कळमकर, अर्जुनराव पोकळे, अंबादास गारुडकर, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहविभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, प्राचार्या छाया काकडे, मुख्याध्यापक शिवाजी लंके यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख उर्मिला साळुंके, शिक्षिका मीनाक्षी खोडदे, सुजाता दोमल, शितल रोहकले, शिल्पा कानडे, जयश्री खांदोडे, सोनाली अनभुले, रूपाली वाबळे, भाग्यश्री लोंढे, भारती सुसरे, इंदुमती दरेकर, पुनम धाडगे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

मुख्याध्यापक शिवाजी लंके म्हणाले की, या गुणवंत विद्यार्थ्यांनी शाळेचे व शहराचे नाव राज्य पातळीवर उज्ज्वल केले आहे. हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नव्हे, तर शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व पालकांचे सहकार्याचे फलित आहे. शाळेत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरतेच मर्यादित न ठेवता त्यांच्यामध्ये विचारशक्ती, बुद्धिमत्ता आणि आत्मविश्वास यांचा विकास घडविण्याचे कार्य सुरु आहे. मंथनसारख्या स्पर्धा परीक्षेमुळे मुलांचे आकलन व चिंतनशक्ती वृद्धिंगत होत असल्याचे सांगून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले.

**राज्य गुणवत्ता यादीत यशस्वी विद्यार्थी :** इ. १ ली स्वरव अनभुले (४ था), स्वर्णिम मोकाटे (५ वा)., इ. २ री श्रीराज गुंजाळ (१ ला), गार्गी ठाणगे (१ ली), युवराज भोर (२ रा), रुद्र गुंजाळ (२ रा), वेदांत अंधारे (४ था), आराध्या जाधव (५ वी), अद्वैत खेडकर (५ वा), वरद नाबगे (५ वा), विनय नाबगे (५ वा)., इ. ३ री आस्था सुंबे (३ री)., इ. ४ थी आरुषी बनकर (३ री), अथर्व अनभुले (४ था), आरुषी जाधव (५ वी).

**जिल्हा गुणवत्ता यादीतील यशस्वी विद्यार्थी :** इ. १ ली सानवी कोहक (१ ली), अपूर्वा भोंडवे (२ री), आयुष गंभीरे (२ रा), अद्रिका गाडीलकर (३ री)., इ. २ री भक्ती बारगजे (१ ली), भूमी शिंदे (१ ली), शामवी हंबर्डे (२ री), श्रुती फसले (२ री), स्वरां अंधारे (३ री), दुर्वा भोसले (३ री), पृथ्वी पिंपळे (३ री), गायत्री कडूस (४ थी), शौर्य मुळे (४ था), हर्षनी नांगरे (४ थी)., इ. ३ री सरफराज शेख (१ ला), पार्थ जाधव (३ रा), आयुष सोनमाळी (३ रा), आरोही सोनवणे (५ वी)., इ. ४ थी कपिष टकले (१ ला), ओवी बडवे (२ री), आर्या जाधव (३ री), श्रेया रक्ताटे (३ री), वरद झावरे (३ रा), अर्णव बोरुडे (४ था), स्वराज कार्ले (४ था), कीर्ती शिरसे (४ थी), प्रज्ञेश जाधव (५ वा), कृष्णवीर जगदाळे (५ वा), अनय मुनफन (५ वा).

# हिवरे झरे परिसरात अनधिकृत उत्खनन

## ग्रामस्थांचे तहसिलदारांना निवेदन, कारवाईसाठी रास्तारोकोचा इशारा


हिवरे झरे (ता.नगर) परिसरात बोअर ब्लास्टिंग करुन अनधिकृत उत्खनन सुरु असून त्यावर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन तहसीलदार संजय शिंदे यांना देताना ग्रामस्थ.


नगर – नगर तालुक्यातील हिवरे झरे परिसरात बोअर ब्लास्टिंग करुन अनधिकृतपणे राजरोसपणे उत्खनन सुरू आहे. बोअर ब्लास्टिंगमुळे शेतकऱ्यांच्या घरावर दगड पडून पत्र्यांना छिद्र पडले आहे. तसेच बोअरवेलचे पाणी गायब होत असल्याने शेतकऱ्यांवर ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी भटकंतीची वेळ आली आहे. ब्लास्टिंग करुन होत असलेले उत्खनन तात्काळ न थांबविल्यास ७ दिवसांच्या आत कोणत्याही क्षणी रास्तारोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

याबाबत तहसिलदार संजय शिंदे यांना निवेदन देण्यात आले आहे. हिवरे झरे गावच्या हद्दीमध्ये घोसपुरी रोड परिसरात हिवरे झरे व बाबुर्डी बेंद येथील नागरिकांच्या शेत जमीनी आहेत. तसेच या परिसरात काही लोकही राहतात. हिवरे झरे हद्दीतील गट नंबर ३११ व ३०७ मधील बेकायदेशीर उत्खननाबाबत ग्रामस्थांनी १० जानेवारी २०२५ रोजी महसूल प्रशासनाला निवेदन दिले होते. बोअर ब्लास्टिंगमुळे परिसरातील घरांचे नुकसान झाले आहे. विहिरी, बोअरवेलचे पाणी गेले आहे. पोल्ट्री शेडचे नुकसान झाले आहे. पशु पक्षी व माणसांना त्रास सहन करावा लागत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. तसेच विना नंबरचे ओव्हरलोड ढंपरही दिवस रात्र सुसाट धावत असल्याने नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान ३ फेब्रुवारी २०२५ रोजी गावच्या हद्दीत डबर खाणींना परवानगी न देण्याचा ठराव घेण्यात आला आहे. तरीही हिवरे झरे परिसरात अनधिकृत उत्खनन राजरोसपणे सुरुच असल्याने ते तातडीने बंद करावे अन्यथा रास्तारोको करण्यात येईल असे निवेदन तहसिलदारांना देण्यात आले आहे.

निवेदनावर माजी सरपंच सुरेश काटे, माजी उपसरपंच रोहिदास उदमले, साकळाई कृती समितीचे सदस्य नारायण रोडे, विश्वनाथ चव्हाण, गणेश पवार यांची नावे आहेत.

# कायमस्वरूपी कार्यालयासाठी सेवानिवृत्त कर्मचारी पेन्शनर्स असोसिएशनला अहिल्यानगर येथे जागा उपलब्ध करून द्या


आ. सत्यजित तांबे



नगर – जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना एकत्र बांधणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचारी पेन्शनर्स असोसिएशन या संस्थेसाठी कायमस्वरूपी कार्यालयाची निकड असून, ही गरज ओळखून आमदार सत्यजीत तांबे यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अहमदनगर महानगरपालिका आयुक्त यांना पत्र पाठवून, शहरातील अहिल्यानगर परिसरात संस्थेसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

पेन्शनर्स असोसिएशन ही जिल्ह्यातील हजारो सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मानसिक, सामाजिक आणि कायदेशीर पाठबळ देणारी संस्था आहे. सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यात आरोग्य, पेन्शन, विविध शासकीय योजनांचा लाभ अशा अनेक बाबतीत मार्गदर्शन करणे, सदस्यांच्या समस्या शासनदरबारी मांडणे, तसेच सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवणे असे संस्थेचे कार्य आहे. मात्र, अद्यापपर्यंत संस्थेकडे स्वतःचे कार्यालय नाही. यामुळे बैठका घेणे, कागदपत्रांचे व्यवस्थापन व सदस्यांशी संपर्क साधणे या गोष्टींमध्ये अनेक अडचणी येतात.

या पार्श्वभूमीवर आ. तांबे यांनी सामाजिक बांधिलकी जपत, शहरातील मध्यवर्ती व नागरिकांसाठी सुलभ असलेल्या अहिल्यानगर परिसरात पेन्शनर्स असोसिएशनसाठी जागा मिळावी, यासाठी प्रशासनाकडे आग्रह धरला आहे. त्यांनी पत्राद्वारे प्रशासनाला मागणी केली आहे की, ही संस्था शासकीय सेवेतील अनुभवसंपन्न व नागरिकहितासाठी झटलेल्या व्यक्तींची असल्याने त्यांच्यासाठी आवश्यक सुविधा देणे शासनाची नैतिक जबाबदारी आहे.

सदर पत्रात आ. तांबे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विनंती केली आहे की, लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेऊन संस्थेला जागा प्रदान करण्यात यावी, जेणेकरून त्यांचे कार्य अधिक व्यापक व प्रभावी स्वरूपात पुढे नेता येईल. त्यांनी प्रशासनास सुचवले आहे की, महानगरपालिकेच्या किंवा जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील कोणतीही रिकामी शासकीय जागा संस्थेला वापरासाठी उपलब्ध करून देता येईल.

आमदार सत्यजीत तांबे यांच्या या पुढाकारामुळे पेन्शनर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात असून, संस्थेच्या भविष्यातील विकासदृष्टीने हे पाऊल ऐतिहासिक ठरू शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



बेघर कुटुंबीयांना स्वतःचे घर भेटण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले.

# स्वतःचे घर भेटण्यासाठी बेघर कुटुंबीयांनी काढला अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

नगर – मौजे बोल्हेगाव गावठाण येथील २ हेक्टर ५ आर ही जागा महाराष्ट्र शासनाची असून ती शासनाच्या ताब्यातच आहे. त्या जागेवर मागासवर्गीय व अनुसूचित जाती जमातीचे १५० ते २०० कुटुंब गांधीनगर बोल्हेगाव गावठाण येथे सुमारे १५ ते २० वर्षापासून भाडेतत्त्वावर रहिवास करत आहे. त्यामुळे त्या जागेवर गोरगरिबांच्या घरकुल योजनेअंतर्गत रमाई आवास योजनेसाठी उपयोगात घेऊन योजना राबवण्याची मागणी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील यांना सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्यावतीने निवेदन देण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे उपाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, सतीश साबळे, लक्ष्मण दिवटे, मनीषा शिरसाट, अलका साबळे, जया मोकळ, ललिता लोखंडे, संगीता गाडे, तुकाराम दिवटे, पिंटू तोरडे, प्रीतम अडागळे, आशाबाई पठारे, विशाल लोंढे, आशा मोकळ, जाधव मामा, अण्णा दिवटे, सतीश लोखंडे आदीसह बेघर कुटुंबीय उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, गांधीनगर बोल्हेगाव गावठाण येथे १५ ते २० वर्षापासून भाडेतत्त्वावर राहत असून हे कुटुंब बेरोजगार आहे. त्यामधील काही कुटुंबातील व्यक्ती हे भंगार गोळा करतात मजुरी, हमालीचे काम करतात असे वेगवेगळ्या प्रकारे आपले उपजीविका चालवीत आहे. परंतु त्यांना राहण्यासाठी स्वतःचे घर नसून हे भाड्याच्या घरात राहून भाडे भरावे लागतात तरी त्यांच्या उपजीविकेत पैसे कधी मिळतात तर कधी मिळत नाही अशा त्यांना भाडे भरणे परवडत नाही तरी बोल्हेगाव गांधीनगर येथे महाराष्ट्र शासनाच्या नावे असलेली पडीक जागा सुमारे १ एकर रमाई आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, यशवंत आवास योजना राबवण्यासाठी घरकुलसाठी मिळावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

